# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २०११ |
| वर्ष | : | बारावे |
| अंक | : | ७ |
| पृष्ठे | : | ४४ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०११**

**गणपत्रिका क्रमांक : १६७**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष बारावे / अंक ७ / जुलै २०११



## संपादकीय

## जाहिरातबाजी की फसवेगिरी

'शिकाल तर वाचाल' असे प्रतिपादन सर्वच लोक आग्रहाने करीत असतात. अर्थातच यामध्ये शिक्षणाचा अभिप्रेत असलेला अर्थ 'साक्षरता' किंवा 'शालेय' शिक्षण असा असतो. 'साक्षरता अभियाना'ची किंवा 'सर्व शिक्षा अभियाना'ची मोहीमसुद्धा याच शिक्षण प्रसाराचा एक भाग म्हणून राबवली जाते. शिक्षितांच्या संख्येवरून प्रगतीचा निर्देशांकही मोजला जातो. साक्षर तो 'सुसंस्कृत' व निरक्षर तो 'असंस्कृत' या समजुतीचा उगमही 'शिक्षण माणसाला घडवते' या विश्वासात आहे. यातच विज्ञानाच्या शिक्षणाला आणखीन झुकते माप आहे. 'वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगा' हा सल्ला उठता बसता देणे ही तर 'पुरोगामित्व' दाखण्याची किमान पात्रता ठरली आहे. विज्ञानाचे जे काही नियम असतात, त्यांत निरीक्षण, त्यांची सांख्यिकीय तुलना, तर्कनिरपेक्ष निष्कर्ष या प्रक्रिया अभिप्रेत असतात. विज्ञानाच्या प्रयोगाकरता लागणारी ही दृष्टी जीवन जगताना जर का बाळगली तर त्यामधून 'तारतम्य' आणि 'विवेकी' निष्कर्ष काढण्याची क्षमता व्यक्तीच्या अंगवळणी पडावी ही अपेक्षा असते. जीवनात घडणाऱ्या घटना या गणिती नसतात; अनेकदा तर्कसंगतही नसतात. अशा वेळी 'संतुलित' निर्णय घेणे हा विवेकी बुद्धीचा भाग असतो.

शिक्षणाने हा वैज्ञानिक दृष्टिकोन साध्य झाल्याचे चित्र मात्र वास्तवात दिसत नाही. भांडवलशाही रचनेत 'नफा' हे यशाचे महत्त्वाचे मोजमाप आहे. एखादी वस्तू विकायची असेल तर, ती आधिकाधिक आकर्षक स्वरूपात सादर करावी लागते. तिच्यामध्ये असलेले, नसलेले सर्व 'गुण'असल्याचा 'आभास' निर्माण करावा लागतो. याचीच शास्त्रीय मांडणी म्हणजे 'जाहिरात' बाजी. वस्तूंनाच नाही तर व्यक्तीनाही मोठे होण्याकरता या जहिरात तंत्राचा वापर करावा लागतो. उपलब्ध असलेली सर्व माध्यमे यासाठी वापरली जातात. आजची वर्तमान पत्रे, सिनेमे, दूरदर्शन ही अशा प्रसाराची किंवा जाहिरताबाजीची 'उघड' माध्यमे होत. या उघड माध्यमांबरोबरच 'छुप्या' जाहिरातबाजीसाठी आणखीन डोके चालवावे लागते. मोटारींच्या जहिरातींमध्ये ललनांचे पाय दाखवतात; वास्तविक ललनांच्या पायांचा गाडीशी काडीमात्र संबंध नसतो. पण असल्या मूर्ख जाहिराती आपण कलेचा आविष्कार म्हणून पाहतो, आणि इच्छा नसली तरी अशा अनेक जाहिराती आपल्याला पुन:पुन्हा पहाव्या लागतात. लोकांच्या स्वास्थ्याचा, सार्वत्रिक नीतिमत्तेचा, राष्ट्रीय सुरक्षेचा आदर

(मलपृष्ठ २ वर)

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष बारावे / अक ७/ जुलै २०११

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक १ ला)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कायम आठवणीत राहिलेली धार्मिक सहल | - श्री. मा. ना. पाटील | ३ |
| २) | महाराष्ट्र मुद्रण परिषद अध्यक्षीय भाषण | - श्री. विलास सांगुर्डेकर | ६ |
| ३) | कस्तुरीगंध | - श्री. मोहन पाठक | ९ |
| ४) | ''चिदाकाश - घटाकाश'' रसग्रहणात्मक | - श्री. सुरेंद्र लागू | १२ |
| ५) | आनंदाचा गुच्छ | - प्रा. श्रीनिवास आठल्ये | १६ |
| ६) | भारतीय संस्कृतीचा मूळ पाया | - श्री. शं. बा. मठ | १८ |
| ७) | खरा परमेश्वर | - श्री. यशवंत माने | २३ |
| ८) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | - श्री. यशवंत साने | २६ |
| ९) | शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या | - मिताली गायकवाड | ३२ |
| १०) | परिसर वार्ता | - संकलित | ३४ |
| ११) | लँण्डस्केप आणि गार्डनिंग : हिरव्या वाटेवरचा एक अनोखा अभ्यासक्रम | - डॉ. नागेश टेकाळे | ३८ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा.
- ❖ अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचार प्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता
  तसेच
- ❖ आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- ❖ आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ करमणुकीसाठी चालणारी असंख्य मासिके / नियतकालिके आहेत.
- ❖ दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- ❖ दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्यामंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
  या पत्त्यावर वा ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल तर आपण सभासद होणे गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- ❖ www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# कायम आठवणीत राहिलेली धार्मिक सहल

*जीवनातील अनेक लहानमोठे प्रवास काही कारणांनी कायम लक्षात राहतात. अशाच एका सहलीचे हे वर्णन. विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ सदस्य व दिशाचे हितचिंतक, मागदर्शक श्री. मा.ना. पाटील यांच्या आठवणीत राहिलेली ही एक सहल - संपादक*

वर्ष १९४२ नासिकला माध्यमिकच्या इ. ४थी मध्ये असताना वर्गातील मुलांनी सायकली वरून वणीला सहल काढण्याचे ठरविले.

वणी म्हणजे सप्तश्रृंगी देवीचे स्थान. नासिकपासून २८ मैल लांब. दिंडोरी तालुक्यातील एक महाराष्ट्रांतील प्रमुख देवीचे स्थान. महाराष्ट्रांत देवींची एकूण प्रमुख ३।। पिठे आहेत. कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची भवानी माता माहूर गडावरची रेणुकामाता आणि वणीची सप्तश्रृंगी माता.



महाराष्ट्रातील सह्य पर्वतामधील सप्तश्रृंगीचा डोंगर अुंचीत दुसरा क्रमांक. पहिला कळसूबाई - इगतपुरी जवळ. सप्तश्रृंगी माता मंदिर सातव्या पठारावर. १९४२ मध्ये आताच्या सारखी बस गाडी जाण्याची सोय नव्हती. वणी गावातून किंवा नांदुरी गावाकडून सहा पठारे पायी चढून जावे लागत होते. अलीकडे लहान गाड्या-बसेस सहाव्या पठारापर्यंत जाण्यासाठी रस्ता झाला आहे व एस.टी. ने बसेसची सोय नांदुरी गावातून केली आहे.

१९४२ मध्ये इ. ४ थी मधील २५-३० विद्यार्थ्यांनी सायकलीवरून सहल काढण्याचे ठरविले. शनिवारी दुपारी शाळा सुटल्यानंतर आम्ही सर्व सायकलस्वार २।।-३ वा. निघालो. डोंगरावर आतासारखी दुकाने, हॉटेल वगैरे काहीही नव्हते. आम्ही बरोबर दोन दिवस पुरेल इतकी कणीक, तांदूळ, तेल, मीठ-मसाला, भाजीसाठी कांदे-बटाटे, लाल भोपळा, देवीसाठी फुले, नारळ असे सर्व बरोबर घेऊन निघालो. दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी काही शिक्षक मंडळी व वर्गातील ७-८ मुली खाजगी बसने येणार होती.

शनिवारी रात्री ७।।-८ च्या सुमारास आम्ही सर्व सायकलधारी वणी गावात पोहोचलो. आमचे ड्रील शिक्षक श्री. पठाण वणीगावात रहात होते. त्यांचे घर व घरापुढील आंगण ऐसपैस मोठे होते. ते आमच्या आधी घरी पोहोचले होते. रात्री त्यांच्या घरी सायकली ठेवल्या व मुक्काम केला. त्यांच्या सौभाग्यवतीने आमच्यासाठी शेवयांचा भात व दुधाची व्यवस्था केली होती. शिवाय आम्ही पोळी-भाजी प्रत्येकाने बरोबर आणली होती. रात्रीचे जेवण उरकून घरासमोरच्या अगंणात आम्ही सर्व झोपलो.

रविवारी सकाळी लवकर अुठून, आंघोळी करून, चहा नाष्टा करून वणी गावाकडून गड चढण्यास सुरवात केली. बरोबर सर्व सामान, नारळ इत्यादी घेतले होते. डोंगरांची, दऱ्यांची शोभा पहाण्याची संधी म्हणून नासिकहून मी एका दुर्बीण बरोबर घेतली होती. माझा एक मित्र देवदत्त फाळके - (भारतातील पहिले चित्रपट निर्माते श्री. दादासाहेब फाळके यांचा मुलगा) त्याचे कडून ती दुर्बीण गुपचूप मिळविली होती.

'संधी सर्वत्र उपलब्ध आहेत, त्या ओळखणे महत्त्वाचे आहे' - वॉल्ट डिस्ने

डोंगर चढताना आम्हांला २।।-३ तास लागले. उन्हाची वेळ होती. चढताना आमच्या बरोबरच्या एकाला वाटेत फीट आली. आम्ही बरोबर नारळ घेतले होते. त्यातील दोन नारळ फोडून त्याला पाणी पाजले व नंतर त्याला धरून धरून वरती नेले. सहाव्या पठारावर पोहोचलो तेव्हा गणपतीचे एक सुंदर मंदिर लागले. त्या मंदिराच्या जमिनीखाली एक पाण्याचे टाके होते. तेथल्या पुजाऱ्याकडून आम्ही एक पोहरा घेतला आणि टाक्यातले उत्तम गार पाणी पोटभर प्यालो. आमच्या सर्वांचा शीण निघून गेला. आम्ही ताजे तवाने झालो आणि पुढे निघालो. वाटेत एक छोटे तळे लागले. त्या तळ्यांत आम्ही काही जणांनी आंघोळी केल्या. देवीच्या मंदिराजवळ पायथ्याला एक धर्मशाळा होती तेथे आम्ही भात व कांदे-बटाट्याची भाजी तयार केली व यथेच्छ जेवलो. आणि शिक्षक मंडळी व इतर बसने येणार होते त्यांची वाट पहात गाणी वगैरे म्हणत वेळ काढत होतो. त्यांची बस वाटेत नादुरूस्त झाल्या मुळे त्यांना वर चढण्यास रात्र झाली.

आम्ही काही विद्यार्थांनी पोळ्या -भात - लाल भोपळ्याची भाजी तयार केली. सर्वांना पिण्यासाठी पाणी लागेल म्हणून तळ्यावर भांडी व एक डबा घेऊन निघालो. तिथल्या लोकांनी आम्हांला बरोबर पेटते टेंभे घेऊन जाण्यास सांगितले. रात्रीच्या वेळी वाघ तळ्यावर पाणी पिण्यास येतो. तो टेंभ्यांना घाबरतो म्हणून टेंभे घेऊन जा असे सांगितले. आम्ही पाणी घेऊन आलो तोपर्यंत शिक्षक मंडळी आली होती. जेवण करून सर्वजण रात्री धर्मशाळेत झोपलो.

सोमवारी सकाळी तळ्यावर आंघोळी करून देवीचे दर्शन करण्यासाठी गेलो. मंदिर डोंगराच्या कड्यावर सातव्या पठारावर आहे. सुमारे ६०० - ७०० पायऱ्या चढून जावे लागते. दर्शन घेऊन परत खाली धर्मशाळेत परतलो. स्वयंपाक करून जेवणे केली व आम्ही सर्व खाली जाण्यासाठी परत फिरलो. आम्ही विद्यार्थी वणी गावाकडे व शिक्षक मंडळी नांदुरीकडे नासिकला परतण्यासाठी खाली अुतरली.

आम्ही वणी गावातून आमच्या सायकली घेतल्या आणि नासिकसाठी परत निघालो. २ मैल अंतर गेलो तेव्हा वाटेत रस्त्याच्या कडेला एका ओढा होता. तेथे एका-दोन सायकलींची पंक्चर काढली. रस्त्याच्या कडेला सायकलीमध्ये हवा भरण्यासाठी आलो. माझ्या गळ्यात ती दुर्बीण लटकटत होती. हवा भरताना ती सारखी मध्ये मध्ये येत होती म्हणून ती काढून खाली ठेवली. हवा भरली व दुर्बीण विसरून तेथेच खाली राहिली व आम्ही सर्व नासिक कडे निघालो.

रात्री सुमारे १०-१०।। वाजले होते. नासिकपासून आम्ही अगदी जवळ ३-४ मैल अंतरावर पाहोचलो होतो आणि दुर्बीणीची आठवण आली. दुर्बीण पंकचर काढले तेथेच राहिली होती. पुन्हा मी व आणखी तीन विद्यार्थी दुर्बीणीसाठी रात्री परत वणीकडे सायकली फिरविल्या.

ज्या ठिकाणी ओढ्यावर पंक्चर काढले त्या ठिकाणापासून अलीकडे आम्ही पोहोचलो तेव्हा गवताने भरलेल्या ४-५ बैल गाड्या नासिककडे चाललेल्या आम्हांला भेटल्या. पहाटेचे सुमारे ४ वाजले होते. त्या गाडीवाल्यांना आम्ही ओढ्याचे ठिकाण किती लांब आहे असे विचारले तेव्हा ते म्हणाले की १० मिनिटे गेलात की तो ओढा लागेल.

त्या ओढ्याजवळ आलो. आंधार होता. नासिककडून परत फिरलो तेव्हां दोन मोठ्या बॅटऱ्या घेतल्या होत्या. बॅटऱ्यांच्या प्रकाशांत शोध घेत आम्ही त्या ओढ्याजवळ आलो, आणि जेथे पंक्चर काढून हवा भरली त्या ठिकाणी जमिनीवर दुर्बीण पडलेली होती. पण आम्हांला वाटेत गाड्या भेटल्या त्या गाड्यांची चाके त्यादुर्बीण वरून गेलेली होती आणि दुर्बीणचा चक्काचूर

---

'इतरांना मदत करणं हा आपल्या आयुष्याचा मूळ उद्देश आहे. तुम्हांला इतरांना मदत करणं जमत नसेल, तर किमान त्यांना दुखवू तरी नका.' - दलाई लामा

झालेला होता. दुर्बीण मिळाली, पण तिची अवस्था पाहून डोळ्यांत गंगा-जमुना वाहू लागल्या. नाईलाज होता. नासिककडे परत फिरलो.

ज्यांची दुर्बीण होती त्यांनी म्हणजे देवदत्तच्या आईनी दुर्बीणचे पैसे मागितले. त्यावेळी ती ७५० रु. ची दुर्बीण होती. वर्गातल्या मुलांनी पैसे गोळा केले ते जेमतेम १४० रु. जमले. ते मी देवदत्तच्या आईला दिले. येवढे थोडे चालणार नाहीत ७५० पाहिजेत. मी म्हणालो, सध्या एवढे घ्या बाकीचे मी काहीतरी करून किंवा नोकरी लागल्यावर देईन. त्याकाही ऐकेनात. थोड्या दिवसानंतर ही गोष्ट श्री. दादासाहेबांना समजली. तेव्हा म्हणाले ''जाऊ दे.'' तू काही मुद्दाम दुर्बीण फोडली नाहीस. पैसे वगैरे काही देऊ नकोस. माझ्याकडे ३-४ दुर्बीणी आहेत. एक गेली तर गेली. वाईट वाटून घेऊ नकोस.

वरील प्रसंगामुळे सप्तश्रृंगी मातेची सहल माझ्या कायम लक्षत आहे.

**– मा. ना. पाटील**
ज्येष्ठ सभासद, वि.प्र.मंडळ ठाणे

●●●

•

पर्यावरणाबाबतच्या जागरुकतेचा भाग म्हणून झाडे लावली जातात, पण अक्षरश: कुठलीही झाडे लावली जातात. यामधून झाडांबद्दलचे प्रेम व्यक्त होत असले तरी आपल्या आसपासचं पर्यावरण, तिथले पक्षी यांचा विचार करून पारंपरिक झाडे लावणेच जास्त योग्य आहे. थोडक्यात सांगायचे तर पर्यावरणाचे जतन करायचे असेल तर थोडे स्वार्थी बनून 'भूमिपुत्र' वा स्थानिक असलेल्या झाडांनाच प्राधान्य देणे गरजेचे आहे.

– संकलित

## चिंतन

संस्था ही कोणतीही असो,
सरकारी, सहकारी, खाजगी या धर्मार्थ,
संस्थेत ठरावीक काम करणे,
हा झाला कायदा.
पण कामात स्वत:ला झोकून देणे,
ही झाली नैतिकता.
मी पगार घेतो म्हणून काम करतो,
हा झाला व्यवहार.
संस्थेच्या अस्तित्वाची, सुरक्षिततेची, प्रतिष्ठेची
योग्य काळजी घेण्याचे कार्य
मला पार पाडावयाचे आहे,
ही झाली आपुलकी.
संस्थेची प्रगती आहे तोवर माझे अस्तित्व कायम आहे.
माझी प्रतिष्ठा आहे म्हणून संस्थेला हानिकारक ठरेल,
अशी कृती मी कधीही करणार नाही.
पण सामाजिक ऋण फेडण्याच्या भावनेने,
स्वत:ला कामात वाहून घेईन.
ही प्रत्येकाची भावना असली पाहिजे,
यातच देशाचा विकास व स्वत:च उद्धार आहे.

तुम्ही कोण आहात हे तुम्हांला जाणून घ्यायचंय? विचारू नका कृती करा, तुमच्या कृतीतूनच तुम्ही कोण आहात हे ठरेल. – थॉमस जेफरसन

# महाराष्ट्र मुद्रण परिषद अध्यक्षीय भाषण

*दिशाचे मुद्रक व हितचिंतक श्री. विलास सांगुर्डेकर यांची राज्य मुद्रण परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्यांनी परिषदेच्या ५५ व्या अधिवेशनात केलेले हे भाषण . मुद्रकांसमोरील आवाहनांचा विचार यांतून व्यक्त झाला आहे.*

**मुद्रक बंधू भगिनींनो,**

महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या ५५ व्या वार्षिक अधिवेशनात मी आपले हार्दिक स्वागत करतो!

या अधिवेशनास प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले कामत उद्योग समूहाचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक श्री. विठ्ठल कामत, म.पु.प. चे अध्यक्ष श्री. मुकुंद इनामदार, सरचिटणीस श्री. विवेक भावे, कोषाध्यक्ष श्री. उदय धोटे, मुद्रण तंत्रशिक्षण आणि संशोधन संस्थेचे अध्यक्ष श्री. आनंद लिमये, AIFMP चे अध्यक्ष श्री. मनोज मेहता, व इतर मान्यवर, मंचावरील माझे सहकारी, संलग्न संघाचे पदाधिकारी, सर्व सभासद, पत्रकार, मुद्रक बंधू भगिनी व मित्रांनो, सर्वप्रथम माझी महाराष्ट्र मुद्रण परिषद या महाराष्ट्रातील शिखर परिषदेच्या अध्यक्षपदी निवड केल्याबद्दल धन्यवाद!! ही निवड करीत असताना तुम्हा सर्वांच्या माझ्याकडून मुद्रण व्यवसाय व आपल्या परिषदेची प्रगती याबाबत काही निश्चित अपेक्षा असणार याची मला पूर्ण जाणीव आहे.



**श्री. विलास सांगुर्डेकर**

आज संपूर्ण जगात मुद्रण व्यवसाय कमालीचा गतिमान व प्रगत होत आहे. वाढत्या संगणकीकरणामुळे आपल्या व्यवसायात उच्च दर्जा व तंत्रकुशलता प्राप्त होत आहे. या नव्या प्रवाहापासून दूर राहणे आता सर्वथा अशक्य आहे.

अगदी छोट्या तालुक्यातील मुद्रकही मोठी स्वप्नं उराशी बाळगून व्यवसाय करताना आढळतात. मात्र जागतिक दर्जाची, प्रसिद्ध उपयुक्त सॉफ्टवेअर्स अधिकृत-रीत्या विकत घेऊन वापरणे हे कदाचित काहींच्या कॉस्टिंग मध्ये बसू शकत नसेल. महाराष्ट्रातील काही लहान मुद्रणालये तर याचा अजूनही विचारसुद्धा करू शकत नसतील. मात्र त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांना अधिकृत सॉफ्टवेअर वापरण्यासाठी प्रोत्साहित करणे हे आपले काम आहे. सॉफ्टवेअर निर्माते व संगणक कंपन्या यांच्या सहकार्याने मुद्रकांना अधिकृत सॉफ्टवेअर कमी दरात उपलब्ध करून देण्यासाठी परिषद गेली तीन वर्ष सतत प्रयत्न करीत आहे. आणि बऱ्याच मुद्रकांनी या संधीचा फायदा घेतला आहे. पण वाढत्या महागाईत त्यांना खरोखरच मुद्रक बंधूंकडून प्रतिसाद मिळवायचा असेल तर त्यांनी आमच्या व्यवसायासाठी त्यांच्या नियमावलीत थोडाफार बदल करणे आवश्यक आहे असे मला वाटते. अशी सॉफ्टवेअर्स मुद्रण व्यावसायिकांना अधिकृतरीत्या कमी दरात उपलब्ध करून दिली जावीत. जर एखाद्या मुद्रकाकडे एकाच ठिकाणी एकाहून अधिक संगणक असतील (कदाचित LAN जोडणीही असू शकते) अशावेळी मुख्य संगणकातील सॉफ्टवेअरसाठी जे मूल्य असेल त्यापेक्षा तुलनात्मक कमी दरात पेपर लायसन्स उपलब्ध करून दिले गेले आणि संपूर्ण पॅकेजमधील एखादा भाग स्वतंत्र दिला गेला तर मुद्रकांना याचा फायदा नक्कीच होईल. आज या अधिवेशनास उपस्थित सॉफ्टवेअर कंपन्याचे अधिकारी

'खरे समाधान प्रयत्नांमध्ये असते, इप्सित साध्य करण्यामध्ये नाही. पूर्ण प्रयत्न करणे हाच खरा विजय - महात्मा गांधी

व वितरक निश्चितच या विनंतीचा लवकरात लवकर विचार करून, आदर्श पर्याय पुढे आणतील याची मला खात्री वाटते.

AIFMP d BMPA, Mumbai Mudrak Sangh यांसारख्या मान्यवर संस्थांनी सुद्धा अशा प्रकारच्या सॉफ्टवेअर्स मध्ये सुसूत्रता येण्यासाठी एकत्र येऊन निर्णय घेणे ही काळाची गरज आहे. विशेषतः मुद्रकांना आवश्यक असलेले Estimate Software स्वत: बनवून मुद्रकांना माफक दरात कशी उपलब्ध होतील या संबंधी तातडीने योग्य ती पावले उचलली जाणे गरजेचे आहे.

शासनाच्या नव्या धोरणामुळे व नव्या तंत्रज्ञानामुळे आपल्या व्यवसायापुढे काही नवी आव्हानं उभी राहात आहेत, याकडेही मी आपलं लक्ष वेधू इच्छितो.

उदाहणार्थ शासनाच्या नव्या शैक्षणिक धोरणामुळे आता शालेय परीक्षांची संख्या कमी होत आहे. काही इयत्तांसाठी तर परिक्षाच घेणे रद्द ठरवले जाते आहे. त्यामुळे अनेक छोट्या मुद्रणालयांकडचे शालेय प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका छापण्याचे काम कमी कमी होत जात आहे.

स्थानिक निवडणुका, सहकार क्षेत्रातील निवडणुकांसाठी आता छापील मतपत्रिकांऐवजी संगणकीय यंत्रांचा वापर वाढत आहे. त्यामुळेही संबधित छपाईच्या कामावर लक्षणीय परिणाम होत आहे.

इंटरनेट, ई-कॉमर्स, मोबाईल व वॅप उपकरणांच्या वाढत्या प्रसारामुळे आता जगभरात 'ई-बुक्स' या नव्या तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने होत आहेत. प्रत्यक्ष छपाई न करता तयार होणारी व इंटरनेट/ सीडी / डी.व्ही.डी. मार्फत वितरित होणारी इलेक्ट्रॉनिक पुस्तके (ई-बुक्स) आजच्या तरुणाईला आवडतात. छपाई व्यवसायावर त्याचा होणारा परिणाम आज तितकासा जाणवत नसला तरी पुस्तके, मासिके, वार्षिक अहवाल व नियतकालिकांची छपाई करणाऱ्या मुद्रकांनी आताच सावध होण्याची वेळ आलेली आहे. किंबहुना, हे नवे तंत्रज्ञान आत्मसात करायला हवे. पुस्तक प्रकाशक अशा प्रकारची ई-बुक्स निर्मिती करून घेण्यासाठी दुसऱ्या तंत्र व्यावसायिकांकडे जाणारच असेल तर ते दुसरीकडे न जाता आपणाकडेच आले व त्यांना त्यांच्या गरजेनुसार ई-बुक्स निर्मिती करून देता आली तर जुने ग्राहक निसटून जाणार नाहीत, याची नोंद आपण घ्यावी असे मला वाटते. आपल्या मुद्रक व्यावसायिकांची पुढची पीढी निश्चित नेट-सॅव्ही व कॉम्प्युटर सहजपणे, लीलया हाताळणारी असणार हे सांगायला कोणा ज्योतिषाची आवश्यकता नाही. पण सध्या आपल्या व्यवसायात कार्यरत असलेल्या ज्येष्ठ मंडळीनी, ज्येष्ठ सेवक वर्गाने, कामगारांनी सुद्धा संगणकाशी झपाट्याने जमेल तशी मैत्री करून घ्यायला हवी. हे नवे तंत्रज्ञान सोप्या शब्दात, प्रात्यक्षिकांसह आपल्यापर्यंत पोहोचण्यासाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी ज्ञानार्जन मेळावे, शिबीरे, कार्यशाळा, व्याख्यानमाला आयोजित करणे आवश्यक आहे. त्यासाठी स्थानिक मुद्रक संघ व आपल्या परिषदेने एकत्र येऊन निश्चित अशी योजना आखणे जरुरीचे आहे. आपल्या पनवेल येथील मुद्रण तंत्रशिक्षण व संशोधन संस्थेची मदत या कामी जरूर होईल. यासाठी संपर्क, प्रसिद्धीचीही आवश्यकता आहे. तसेच या उपक्रमांना आपल्या मुद्रणालयातील कर्मचारी, सेवक, सहकारी आवर्जून उपस्थित राहतील व त्यात स्वतः लक्ष देऊन भाग घेतील इकडे सर्व मुद्रक बंधू भगिनींनी लक्ष द्यायला हवे. संगणकीय माहितीच्या आदानप्रदानामुळे आपल्या दर्जात उच्च व्यावसायिकता आली, तर जागतिक मंदीचे संकट काही पावले तरी निश्चितच मागे जाईल.

मुद्रण व्यावसायिकांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय म्हणजे कागद, शाई व अन्य कच्च्या मालाच्या बदलत्या किमंती. या किमंतीवर आपले कोणतेही नियंत्रण नाही. त्यामुळे केवळ रेट कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने काम करणारे मुद्रक

अचानक उद्भवलेल्या दरवाढीमुळे संकटात पडतात किंवा दिलेल्या कोटेशनची ऑर्डर मिळेपर्यंत दर वाढलेले असतात. या गोष्टीला आळा घालून त्यात सुसूत्रता आणण्यासाठी काय कार्यवाही करता येईल, याबाबत एकत्रितरित्या प्रयत्न होणे गरजेचे आहे.

सध्या या व्यवसायात जीवेघेणी स्पर्धा चालू झाली आहे. बहुदा 'ग्राहकांचे समाधान हाच आमचा फायदा' या ब्रीद वाक्याचे आपण तंतोतंत पालन करीत आहोत. तर दुसरीकडे पेपरचे दर वाढत आहेत. पेट्रोलजन्य पदार्थांच्या किंमती वाढत असल्यामुळे इंक, वॉर्निश, लॅमीनेशन फिल्म, ट्रान्सपोर्ट यांचे दर व विजेचे दर आणि कामगारांचे पगार वाढत आहेत. या सर्वांचा विचार न करता जर आपण व्यवसाय केला, तर कदाचित व्यवसाय बंद करावयाची वेळ आपल्यावर येईल. तेव्हा आपण आताच सावध होऊ या. मी आपणांस आव्हान करतो की आपण सर्वांनी छपाईच्या दरात २०% वाढ करावी. त्याप्रमाणे आपण आपल्या ग्राहकांना या सर्व दरवाढीची कल्पना द्यावी. परिषदेतर्फे यासंबधी पत्रक काढले जाईल. २०% वाढीची पोस्टर आपल्या संघटनेद्वारे छापून ती आपल्या मुद्रणालयात लावावीत. सर्वांनी प्रयत्न केला तर आपल्याला योग्य दर मिळेल याची मला खात्री आहे. तेव्हा उद्या प्रेसवर गेल्यावर पहिले काम हे करू या.

दळणवळणाची साधने वाढली, तीव्र व्यावसायिक स्पर्धा आली, इंटरनेटमुळे सारे जग कवेत आले या सर्वांचा घातक परिणाम म्हणजे आपल्यापैकी काही मुद्रकांकडे असलेली स्थानिक पातळीवरची नियमित मिळणारी मुद्रणाची कामं अन्य विभागात, किंवा मोठ्या शहरांतील मुद्रकांकडे जाऊ लागली. सरकारी मुद्रणाची कामे, सहकारी बँकांची कामे किंवा स्थानिक सामाजिक, शैक्षणिक संस्थांची कामे स्थानिक मुद्रकांनाच मिळायला हवीत, असा अलिखित नियम असायला हवा. त्यासाठी शासनानेही ठराव केला किंवा अधिनियम वजा सूचना केली तर आपल्या अनेक व्यवसायबंधूंना दिलासा मिळू शकेल. अशा गोष्टींसाठी एखादा दबावगट (चांगल्या अर्थाने) तयार झाला व त्यांनी राजकीय वर्तुळातील ओळखींच्या मदतीने आपली ही समस्या वरीष्ठ पुढाऱ्यांपर्यंत पोहोचवली तरच हे शक्य होऊ शकते. अन्यथा महाराष्ट्रातील मुद्रणाची कामे परराज्यांत किंवा परदेशातही जाऊ शकतील इकडे मी लक्ष वेधू इच्छितो.

मुद्रक बंधूनो, आजच्या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने आपण एकत्र जमलो आहोत, ओळखींना मधुर स्वरूप देत आहोत पण हा उत्साह असाच वर्षभर कायम टिकून राहणेही गरजेचे आहे.

महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या संलग्न संघांपैकी काही संघ, जे कार्यरत नाहीत अशा संघाना व त्यांच्या सभासदांना पुन्हा एकदा कार्यरत करण्याचा प्रयत्न आवर्जून करायला हवा. सुरुवातीला उत्साहाने, जोमाने कार्य करणारे हे आपले सदस्य संघ कालांतराने ठप्प का होतात? किंवा का झाले? याची खरी कारणं शोधणे गरजेचे आहे. अशा संघांशी व त्यांच्या कार्यकर्त्यांशी यंदा संपर्क साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्याचा मी आवर्जून प्रयत्न करणार आहे. मात्र या अभियानासाठी आपणा सर्वांची साथ मिळणे अत्यावश्यक आहे.

आपली सर्वांची व्यवसाय कौशल्यं वाढावीत व या क्षेत्रातील उद्योजकतेची नवी-नवी शिखरे आपण सर करावीत यासाठी काही ठोस उपक्रम हाती घेण्याचा माझा प्रयत्न राहील त्यासाठी आपण संघटित राहून, कटुता टाळून एकत्रित येणे व सातत्याने काहीना काही निमित्ताने भेटणे गरजेचे आहे. त्यासाठी स्थानिक मुद्रक संघ जे प्रयत्न करतील त्या सर्व उपक्रमांना म.मु.प. सदैव प्रोत्साहन देईल.

जय हिंद
जय महाराष्ट्र !

**- श्री. विलास सांगुर्डेकर**

●●●


'आयुष्य साधं आहे, सोपं नाही.

पुस्तक परिचय

# कस्तुरीगंध

*कस्तुरीगंध या आत्मचरित्रपर ग्रंथाचा हा परिचय*

आपल्याकडील शैक्षणिक संस्थांचा बारकाईने अभ्यास व विचार केला तर असे लक्षात येते की, नावारूपाला आलेल्या अनेक पिढ्यांचे भवितव्य घडवलेल्या ज्या संस्था आहेत, त्यांच्या जडणघडणीसाठी एखाद्या ध्येयनिष्ठ व्यक्तीने आपले सर्वस्व वेचले आहे. त्यामुळेच या संस्था महाराष्ट्राच्या संस्था जीवनातील दीपगृहे बनल्या. आपल्या ध्येयावरील अशी प्रखर निष्ठा असणाऱ्या व्यक्तींची व्यक्तिमत्त्वे असाधारण असतात. अशा व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वात आईची ममता, प्रेम असते; त्याचप्रमाणे त्यांच्या शैक्षणिक कारकीर्दीला कधी दुधारी तलवारीची दाहकताही असते. एखादी शाळा, महाविद्यालय उभे करण्यासाठी लागणाऱ्या तळमळीबरोबरच आजूबाजूच्या प्रदूषित वातावरणाशी झगडण्यासाठी लागणारी कठोरताही त्यांच्या व्यक्तिमत्त्वात असते.




प्राचार्य रा. शि. सावंत यांच्या आत्मकथनाचा व कार्यगौरवाचा ‘कस्तुरीगंध’ हा ग्रंथ वाचताना त्यांच्या तेजोमय शैक्षणिक वाटचालीचा आदर्श गंध मनात दरवळत राहतो. संस्था कायम राहतात. काळ बदलतो तरीही सावंत सरांसारखे शिक्षक असंख्य मनांमधून अजरामर होतात. अशा शिक्षकांनी ज्यांची जीवने फुलवली त्यांच्या असंख्य आठवणींमधून अशा शिक्षकांचे संस्कार अभिव्यक्त होतात. अशा विद्यार्थ्यांच्या मनावर उमटलेले या शिक्षकांच्या संस्कारांचे ठसे कधीही पुसले जात नाहीत.

भांडुप येथील ‘नवजीवन विद्यामंदिर’ ही अशीच एक नावाजलेली शिक्षणसंस्था. सावंत सरांनी आपले तन, मन, धन अर्पून संस्थेसाठी प्रचंड काम केले. अशा व्यक्तीचे कार्य व त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव अक्षरबद्ध होणे आवश्यक असते. ‘कस्तुरीगंध’ या ग्रंथाने हे साध्य झाले आहे. अतिशय वाचनीय असणाऱ्या या पुस्तकाचा परिचय थोडक्यात करून देणे, ही तारेवरची कसरत आहे. प्राचार्य हा आपल्या हाताखालील शिक्षकांचा संघनायक असतो, हे व तो कसा असावा हे, या पुस्तकाच्या शब्दाशब्दांतून जाणवते. तेथे कर माझे जुळती, या ओळी अशा व्यक्तींच्या कार्य कर्तृत्वाबद्दल आदरभाव निर्माण करण्यासाठीच लिहिल्या गेल्या आहेत, याचा अनुभव हे पुस्तक वाचल्यावर येतो.

अशी व्यक्तिमत्त्वे घडवण्यात ईश्वरी प्रेरणा असते. देवगड तालुक्यामधील वळिवंडे या छोट्या गावातील मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात जन्म झालेले सावंत सर मुंबईला येतात काय व या कर्मभूमीत ईश्वरी संकेतानुसार एक आदर्श शिक्षक उभा राहतो काय ... हा सर्व तर एखाद्या काल्पनिक कथेतील वाटावा असा; पण सत्याच्या

‘बड्यांचा भ्रष्टाचार हा सगळ्यात वाईट’

चौकटीत बसलेला इतिहासाचा एक अविष्कार आहे. बालपणीच सावंत सरांच्या व्यक्तिमत्त्वावर नररत्न शिवाजीमहाराज आणि संभाजी महाराज यांचा प्रभाव पडला. त्यांच्या त्या जडणघडणीच्या काळात पूज्य सानेगुरुजींच्या साहित्याचाही प्रभाव त्यांच्यावर झाला.

विद्यार्थी दशेतून संसारिक जीवनाच्या वाटचालीला त्यांनी सुरुवात केली. अनेक संसारिक कथा व्यथांनी त्यांचा जीवनपट घडत गेला. भावनाप्रधान असलेल्या, तरीही विवेकाची कास न सोडणाऱ्या सावंत सरांनी 'मी जो आज काही आहे, जे काही विशेष कार्य माझ्या हातून होत आहे त्यातील सिंहाचा वाटा हा माझ्या पत्नीचा आहे,(पृष्ठ २३) अशा शब्दांत आपला भाव व्यक्त केला आहे.

१९५८ साली भारत नाईट हायस्कूलमधून त्यांनी अध्यापकीय जीवनाचा श्रीगणेशा केला. आपल्या या सुरुवातीच्या कालखंडातील अध्यापकीय शैलीचे नेमके वर्णन या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणात सावंतसरांनी केले आहे. ते वाचल्यानंतर असे जाणवते की त्यांचे अध्यापन व समर्पित जीवन पाहूनच आदर्श शिक्षकाची व्याख्या करण्यात आली असावी. पुढील वर्णनावरून याची आपल्याला कल्पना येईल. ''समोर विद्यार्थी आहे, तो जाणकार आहे तेव्हा पूर्ण तयारीनिशी अभ्यास करूनच वर्गात गेले पाहिजे, अशी माझी धारणा होती व त्याप्रमाणे मी पथ्य पाळत होतो'' (पृष्ठ २५-२६) आजच्या शिक्षणाचा बाजार झालेल्या जगातील शिक्षकांनी सावंत सरांचे हे अनुभव गीतेतील उपदेशाप्रमाणे आचरणात आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न करायला हवा, हे मला त्यांच्या अनुभव कथनांतून जाणवले.

आपल्या या जीवन प्रवासात १९७० च्या अखेरीस नवजीवन शिक्षण संस्थेची स्थापना झाली. संस्थेचे प्रमुख प्रवर्तक व कार्यवाह या जबाबदाऱ्या सावंत सरांकडे आल्या. संस्थेची घटना बनवण्यापासून ते संस्थेतील प्रत्येक कार्यक्रम व्यवस्थित पार पडावा, इथपर्यंत सावंतसरांचे योगदान आहे. ज्या भांडुप विभागात मराठी माध्यमाची एकही शाळा नव्हती त्या भांडुपमध्ये या संस्थात्मक प्रवासाचे रोपटे लावण्यात आले. मुंबईतील मराठी माणूस हळूहळू उपनगराकडे सरकत होता. त्यामुळे निश्चयाने आणि योजनाबद्ध पद्धतीने काम करणाऱ्या मंडळीबरोबर लावलेल्या या इवल्याशा रोपट्याचा वटवृक्ष कधी बहरला याबद्दलचे हे अनुभव मुळातून वाचण्यासारखे आहेत. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हावा, तशीच संस्था अनेक शैक्षणिक व शिक्षणेतर उपक्रमांनी बहरत गेली. रौप्य महोत्सवाचा टप्पा, तंत्रनिकेतनाची उभारणी, उच्च महाविद्यालयीन शिक्षणाची सोय, शाळा महाविद्यालयांची ग्रंथालये... एकेक स्वप्न आकारत गेले व जीवन विकासाचे संकुल उभे राहिले.

एक पूर्ण प्रकरण 'माझ्या कल्पनेतील आदर्श शिक्षक' (पृष्ठ १३९ ते १४२) या नावाने आहे. या प्रकरणातील सरांचे विचार अतिशय मोलाचे आहेत. 'उत्तम शिक्षक हा तयार करता येत नाही, तो जन्मत: हाडाचा शिक्षक असावा लागतो.' (पृष्ठ १३९) हे वाक्य महाराष्ट्रातील आदर्श शिक्षण परंपरेतील अनेक उत्तमोत्तम शिक्षकांचे स्मरण करून देते. नवनीत पब्लिकेशनचे संचालक श्री. जितुभाई गाला यांनी आपल्या शुभ संदेशात म्हटले आहे, 'ही देदीप्यमान परंपरा आपण तन - मन - धनाने समर्पित होऊन जपलीत, जोपासलीत. ज्ञानदानाचा पवित्र वारसा आपण निष्ठेने आणि आत्मीयतेने चालू ठेवलात.' (पृष्ठ ९) यांतील प्रत्येक शब्दाचा प्रत्यय या ग्रंथातून येतो. अशा ग्रंथात आजच्या वास्तवातील घसरत्या मूल्यव्यवस्थेबद्दल आक्रोश करून आपल्या दु:खाचे हिडिस प्रदर्शन मांडण्याचा मोह अनेकांना होतो. डॉ. भरतकुमार राऊत यांनी त्यांच्या प्रास्ताविकात म्हटल्याप्रमाणे, ''तोंडातून बाहेर पडू पहाणारा हुंदका ओठांच्या सीमेत अडवणारे आणि डोळ्यांतून वाहणारे उष्म अश्रू पापण्यांच्या कुंपणातच साठवणारे सावंत त्यावेळी एखाद्या हठयोग्याप्रमाणे वाटतात.''

या पुस्तकाची विभागणी चार भागांमध्ये आहे. १) मनोगत एक संस्मरण... (आत्मकथन) प्रा. रा. शि. सावंत २) जीवन प्रवास ३) 'कार्यगौरव' व ४) ऋणनिर्देश. कार्यगौरव या भागातील लेख सावंत सरांच्या सहवासात आलेल्या व्यक्तींनी त्यांना आलेले अनुभव यावर आधारित आहेत.

ग्रंथाचे संकलन व शब्दांकन श्री. अमृत मां. पाटील यांनी केले आहे. त्यांची भाषा ओघवती साधी व सरळ आहे. त्यामुळे सावंतसरांच्या जीवनातील सर्व लहान मोठे प्रसंग चित्ररूपाने आपल्यासमोर साकारतात. अशा ग्रंथाची निर्मिती हे एक आव्हान असते. मुद्रण दोषांपासून ते मजकुराच्या मांडणी पर्यंतची अनेक व्यवधाने पाळावी लागतात. अशा प्रकारच्या ग्रंथात छायाचित्रांचा एक भाग अनिवार्य असतो. या छायचित्रांची मांडणी, त्यांची वर्णने करणारे शब्द हे सर्व बारकाईने पहावे लागते. पुस्तकाच्या प्रास्ताविक पृष्ठांमध्ये समाविष्ट केलेल्या सरस्वतीच्या प्रतीक चित्रापासून ते मलपृष्ठावरील नंदादीपापर्यंत सर्व पुस्तकाचा बारकाईने अभ्यास केल्यास निर्मितीसाठी घेण्यात आलेल्या कष्टांची, त्यामागील दृष्टीची आणि अनुभवाची प्रचिती येते. या दृष्टीने सदर ग्रंथाचे निर्मिती समन्वयक छाया - अनिरुद्ध (पागे) यांचा उल्लेख निश्चितच करावा लागेल. श्री. गणेश, श्री. सरस्वती व संतशिरोमणी ज्ञानेश्वर महाराज यांच्या अप्रतिम छायाचित्रांनी सुरू होणारे हे पुस्तक वाचन पूर्ण होते, तेव्हा भारावून टाकते. अध्यापन क्षेत्रातील सर्व लहान मोठ्या शिक्षकांनी हे पुस्तक केवळ वाचावे, एवढेच नव्हे तर त्यापासून बोध घ्यावा आणि दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक असणाऱ्या यातील विचारांचे आचरण करावे हे आवर्जून सांगावेसे वाटते.

पुस्तकाच्या अखेरीस नामनिर्देश सूची असती तर यातील संदर्भ शोधणे आधिक सोपे झाले असते. तसेच, या बहुआयामी व्यक्तिमत्त्वावर ज्यांनी लेख लिहिले आहेत, त्यांची छायाचित्रे त्यांच्या लेखाच्या सुरुवातीस देणे सयुक्तिक ठरले असते.

कस्तुरीगंध ( तेजोमय शैक्षणिक वाटचाल)
सावंत, रा. शि.
शब्दांकन - पाटील अमृत मां.
मुंबई, नवजीवन शिक्षण संस्था, २०११
मूल्य रु. २२५/-

**- मोहन पाठक**
ठाणे

## फ्लोरिडाचे हार्न वस्तुसंग्रहालय

फ्लोरिडा विद्यापीठाचा एक भाग असणाऱ्या 'द सॅम्युअल पी. हार्न' कला वस्तुसंग्रहालयात २६,००० चौरस फूट दालनातील अशियाई कला हा विभाग जनतेसाठी खुला करण्यात आला आहे.

या वस्तुसंग्रहालयाच्या १) अशियाई कला २) अफ्रिकन कला ३) छायाचित्रे ४) अमेरिका व युरोपातील आधुनिक कला व ५) अंतरराष्ट्रीय समकालीन कला या पाच दालनांत एकूण ८०,००० च्या वर वस्तूंचा संग्रह आहे. आधिक माहितीसाठी www.harn.ufl.edu या संकेतस्थळाला भेट द्यावी.

संदर्भ - एशियन आर्ट एप्रिल २०११
पृ. १ (खंड १४ अंक ६)


# ''चिदाकाश - घटाकाश'' रसग्रहणात्मक

*चिदाकाश – घटाकाश या पुस्तकाचे हे परीक्षणवजा रसग्रहण. हे वाचल्यावर प्रा. अरुण ओगले यांचा हा ग्रंथ मुळातून वाचावा अशी प्रेरणा आपल्याला मिळते – संपादक*

**घटीं व्यापक जे आकाश। तया नाव घटाकाश।** पींडी व्यापक ब्रह्यांड। त्यास जीवात्मा बोलिजे।। मठीं व्यापक जे आकाश। तया नाव महाकाश। तैसा ब्रह्यांडी जो ब्रह्यांश। त्यास शिवात्मा बोलिजे।। मठाबाहेरील आकाश। तया नाव महदाकाश। ब्रह्यांडाबाहेरील ब्रह्यांश। त्यास परमात्मा बोलिजे।।

**उपाधी वेगळे आकाश। तया नाव चिदाकाश।** तैसा निर्मळात्मा परेश। तोउपाधी वेगळा।।

– श्री रामदास स्वामी




संत श्रेष्ठ श्री समर्थ रामदास यांनी साडेतीनशे वर्षांपूर्वी अद्वैतासंबंधी मांडलेले विचार वास्तुकला संकल्पनेविषयी किती अर्थपूर्ण आणि पुस्तकाशी निगडित आहेत, याची कल्पना हे पुस्तक वाचल्याशिवाय येणार नाही.

यापूर्वी देखील परमपूज्य शंकराचार्यांनी अद्वैताचा सिद्धांत मांडताना ह्या रूपकाचा वापर केला आहे, ज्याचे रूपांतर Unbound Space आणि Bound Space असे करता येईल. ''चिदाकाश'' म्हणजे सर्व व्यापी निर्गुण निराकार अवकाश, जे शंकाराचार्य ब्रह्याचे प्रतीक म्हणून वापरतात आणि एखाद्या घटामध्ये असणारे ह्या अवकाशाचे अस्तित्व म्हणजे ''घटाकाश''!

Arctitecture म्हणजे वास्तुकला; तिची सोपी व्याख्या ''अवकाश सामाविण्याची कला'' अशी करता येते. त्या व्याख्येतला अभिप्रेत अर्थ म्हणजे शंकराचार्यांचे हे अद्वैताचे रूपक आहे. पुस्तकाचे लेखक प्रा. अरूण ओगले ह्यांचे प्रगल्भ विचार वास्तुकलेची महती व महात्म्य मानवी जीवनात किती व कसे आहे हे अधोरेखित करतात.

पुस्तकाचे लेखक प्रा. अरुण ओगले – साडेचार दशकांचा प्रदीर्घ व समृद्ध अनुभव. प्रथितयश आणि विशेष नावलौकिक असलेले, वास्तुकलेकडे केवळ ''व्यवसाय'' म्हणून न पाहता 'पेशा' म्हणून या कलेची सेवा करणारे वास्तुतज्ज्ञ म्हणून या क्षेत्रात सुपरिचित आहेत. व्यावसायिक म्हणून जशी त्यांची ओळख आहे तद्वतच विद्यार्थी व अध्यापक प्रिय प्राध्यापक म्हणूनही त्यांच्याकडे आदराने आणि सन्मानाने बघितलं जाते. 'मी ओगले सरांचा विद्यार्थी आहे.' असे अभिमानाने आणि कृतज्ञतेने सांगणारे अनेक विद्यार्थी आहेत, हे स्वानुभवावरून सांगू इच्छितो. ऑल इंडिया आर्किटेक्ट ॲसोसिअेशनचे उपाध्यक्ष या नात्याने त्यांचे मोलाचे योगदान आहे. ही जबाबदारी त्यांनी समर्थ व यशस्वीपणे पार पडली. या कालावधीत संघटनेचे अनेक प्रश्न त्यांनी मार्गी लावले. अनेक नवनवीन उपक्रम सुरू केले. संघटनेत त्यांनी स्वतःचे स्थान निर्माण केले. ह्या योगदानाबद्दल त्यांना सन्मानितही करण्यात आले होते.

---

'तुम्ही जितकी आधिक मेहनत कराल, तितकं नशीब तुमच्या जवळ येतं. – थॉमस जेफरसन

वास्तुकलेमध्ये मराठी भाषेत प्रकाशित झालेली पुस्तके फारच थोडी आहेत; आणि या दृष्टीने विचार केल्यास सदरहू पुस्तक मैलाचा दगड आहे असं म्हटलं तर अतिशयोक्ती होणार नाही. ''वास्तुकला विषयाचा शिक्षणक्रम घेणाऱ्या व मराठी जाणणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रारंभीच मातृभाषेतून वास्तुकला विषयक जाणिवा व संवेदना निर्माण करण्यास हे पुस्तक निश्चितच उपयोगी पडेल, मार्गदर्शक ठरेल व पुढील अभ्यासक्रमाची उकल करून घेण्यास याचा निश्चितच उपयोग होईल, मार्गदर्शक ठरेल व पुढील अभ्यासक्रमाची उकल करून घेण्यास याची निश्चितच मदत होईल. इतर वाचक वर्गातसुद्धा या कलेची योग्य आवड आणि गोडी निर्माण करण्यात हे पुस्तक यशस्वी होईल याची खात्री वाटते'' थोर वास्तुतज्ज्ञ श्री. बाळकृष्ण दोशी यांचे हे विचार फार मोलाचे आहेत.

प्रस्तुत पुस्तकामध्ये लेखकाने वेळोवेळी विविध निमित्ताने वास्तुकलेसंबंधी लिहिलेल्या लेखांतील निवडक लेखांचे संकलन केले आहे. प्रा. अरूण ओगले यांचे मित्र आणि प्रेरणा स्थान असलेले या क्षेत्रातील प्रसिद्ध वास्तुतज्ज्ञ आणि सृजनशील लेखक कै. प्रा. माधव आचवल यांना ते समर्पित केले आहे.

पुस्तकाचे लेखक ज्या महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे डॉ. बी. एन्. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पुणे येथे अध्यापनाचे कार्य करीत आहेत त्या संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. केवळ ही एकच गोष्ट, संस्था चालकांचा प्रा. अरुण ओगले यांच्यावरील असलेला विश्वास, त्यांची शिकवण्याची तळमळ, या क्षेत्रामधील त्यांचा समृद्ध अनुभव, त्यांची विद्यार्थीप्रियता, विषयाचे सखोल ज्ञान, त्यांचा नावलौकिक आणि सृजनशीलता यांचे उत्तम प्रतीक आहे. या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनुराग काश्यप आपल्या मनोगतात म्हणतात ''प्रा. अरुण ओगले एक ज्येष्ठ प्राध्यापक म्हणून त्यांचे वेगळेपण म्हणजे वेद, उपनिषदे यांच्या अभ्यासातून निवडलेल्या गोष्टींचे ते वास्तू संवेदनेत परिवर्तन करून विद्यार्थ्योसमोर मांडण्याची त्यांची हातोटी यामुळे विषय आवडीचा होता. सततची प्रयोगशीलता, अभ्यासपूर्ण गृहपाठ, संशोधन वृत्ती, आपला विषय नावीन्यपूर्ण कल्पनांनी, तळमळीने व प्रभावीपणे सादर करण्याचे कसब, मनमोकळा परंतु परखड स्वभाव या गुणवैशिष्ट्यांमुळे ओगले सर केवळ विद्यार्थ्यांमध्येच नव्हे तर सह प्राध्यापकांत देखील आदरणीय आहेत. सत्तरीत देखील त्यांची कार्य विपुलता आणि उत्साह कायम आहे.''

प्रथितयश आणि उच्चकोटीचे थोर वास्तुतज्ज्ञ श्री. बाळकृष्ण दोशी यांची पुस्तकाला लाभलेली प्रस्तावना अतिशय हृद्य आणि बोलकी आहे. लेखक श्री. अरुण ओगले यांचे विषयी आणि वास्तुकलेसंबंधी भावना व्यक्त करताना ते म्हणतात, ''भारतीय पारंपरिक वास्तुकलेची बीजे समाजाच्या पूर्व संस्कारात होती. त्याची प्रतिमा आपल्या देशामधील विविध वातावरणातील वास्तूंत, ऐतिहासिक वास्तूत - नगर रचनांमध्ये पडलेली दिसते. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, ऐतिहासिक संस्थांच्या जडणघडणीचा वास्तुकला आविष्काराशी एक अनोखा संबध आहे.'' श्री. अरुण ओगले ह्यांच्या विषयी भावना व्यक्त करताना श्री. दोशी पुढे म्हणतात. ''सर्व सामान्यापर्यंत वास्तुकलेसंबंधीची योग्य जाणीव पोहोचविण्याचे कार्य फार महत्त्वाचे आहे. वास्तुकलेसारखा विषय मातृभाषेतून लेखांद्वारे जनसामान्य वाचकांपर्यंत नेण्याचे कठीण काम श्री. अरुण ओगले यांनी केले असून ते उल्लेखनीय आणि अभिनंदनीय आहे.''

लेखकाचे लेखनकौशल्य, भाषा समृद्धी, वास्तुकला संवेदना यांबाबतचा विचार आणि विशेष म्हणजे उपनिषदातील ''आस्वाद्य ते सुंदर'' या भरतमुनींच्या सौंदर्यशास्त्राचे सूत्र लेखकाने पक्के समजून घेतले असल्याने त्यांच्या लिखाणातून निखळ आनंद मिळतो; आणि तो सतत दुसऱ्याला देण्याचा वसा त्यांनी घेतला आहे.

'एखादी व्यक्ती आपल्या हातातील सत्ता कशी वापरते, हा त्या व्यक्तीला जोखण्याचा महत्त्वाच्या निकष ठरतो. - प्लेटो

सामान्य व्यक्तीला वास्तुकला, वास्तुशास्त्र, वास्तुविशारद, वास्तुतज्ज्ञ या संज्ञांच्या अर्थासंदर्भात संभ्रमावस्था असते. मात्र पुस्तक वाचल्यानंतर प्रत्येक शद्बाचा योग्य अर्थ काय आहे याची कल्पना येते.

पुस्तकामध्ये लेखकाच्या वास्तुकलेवर वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या १५० लेखांपैकी काही निवडक लेखांचे हे पुस्तक असून वाचकांना सोयीचे व्हावे या दृष्टीने आढावा, प्रासंगिक, मान्यवर वास्तुतज्ज्ञांचा परिचय, त्यांच्या मुलाखती, विविध शिल्पकलांविषयीची माहिती आणि लेखकाचा लेखन प्रवास अशा विभागांद्वारे त्यांची मांडणी केली आहे.

खरंतर प्रत्येकाने पुस्तक वाचल्यावर त्याची अनुभूती निश्चितच येईल. परंतु काहींचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही म्हणून ते उद्धृत करीत आहे.

वास्तुकलेचं मर्म सांगताना लेखक म्हणतो, ''इमारती म्हटल्या की दगड, विटा, चुना लाकूड, सिमेंट या शिवाय दुसरे काय दिसणार? परंतु या सर्वांच्या रचनेतून साकार झालेल्या घरात न दिसणारी पण अस्तित्वात असलेली एक विशेष अनुभूती असते, जी आपल्या अंतरमनोव्यापारांना प्रतिसाद देते, आपल्या जीवन प्रवाहांना प्रेरित करते. बाहेरून आलेल्या जीवनाला विसावा देते, अशी ही घरामधील प्रेरणा शक्ती कोणती याचे विवेचन चिनी ततवेत्ता लाओत्से मोठ्या मार्मिकतेने करतात. विशेष म्हणजे त्यांची सोपी भाषा हीच त्यातील तात्त्विक वैज्ञानिक अर्थ सुलभतेने उकण्यास मदत करते. वाचकांनी ते जरूर वाचावे.

बाहेरील जग, आपला देश, महाराष्ट्र अशा विविध स्तरांवर झालेला वास्तुकलेचा विकास आणि विस्तार यासंबंधीची माहिती अतिशय उपयुक्त आणि मोलाची असून वाचकांनी ती जरूर वाचावी. परंतु वस्त्यांची पैदास, शहराकडे धावणारा खेड्यांतील लोकांचा लोंढा आणि सर्वांच्या मुळाशी असलेला लोकसंख्येचा प्रचंड प्रक्षोभ असे वास्तुकला क्षेत्राचे विदारक चित्र आपणाला अस्वस्थ करते. सदरहू लेख आपणाला अंर्तमुख करतो. महाराष्ट्राची वास्तुकला कशी विकसित होत गेली याची सविस्तर माहिती वाचकाला अन्य लेखांतून जरूर मिळेल.

मुंबईसारख्या देशाची आर्थिक राजधानी असलेल्या शहराचे सौंदर्य वाढविण्यासाठी काय करता येईल? याचा उहापोह, ख्यातनाम वास्तुतज्ज्ञांच्या मुलाखती, षण्मुखानंद हॉल आणि विज्ञान भवन या वास्तूंचा केलेला कायाकल्प या बरोबरच आर्किटेक्चर डिप्लोमाधारकांवरील झालेल्या अन्यायाचा लेख या विषयीची अतिशय उद्‌बोधक माहिती ''प्रासंगिक'' या सदराखाली वाचकाला मिळेल यामुळे आपल्या ज्ञानात निश्चितच भर पडेल.

पुस्तकातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे अतिशय प्रतिभावान, कर्तृत्ववान, सृजनशील आणि जागतिक कीर्ती व सन्मान प्राप्त केलेले वास्तुतज्ज्ञ बाळकृष्ण दोशी, चार्लस कोरिया, अच्युत कानविंदे, जोसेफ ॲलन स्टाईन, युगप्रर्वतक फ्रेंच वास्तुतज्ज्ञ लकार्बूझिओ, रिचर्ड बॅकमिनस्टर फुलर अशा सारख्या दिग्गज व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय वाचकाला एकाच ठिकाणी वाचावयास मिळणं हा उत्तम योग आहे.

रसग्रहण विभागामधील साबरमतीचे शिल्पकाव्य, दिल्लीतील गांधी : जीवन व तत्वज्ञान प्रदर्शन, भुवन सोमची निर्मिती, पृथ्वी थिएटर, मोंगल व हिंदू वास्तूकला यांचा समन्वय या साऱ्यांविषयीची माहिती तपशील मुळातच वाचण्याची, त्यावर विचार करण्याची गरज आहे. या सर्व लेखांमुळे आपल्या ज्ञानकक्षा, आपलं अनुभवविश्व समृद्ध आणि व्यापक होईल.

माझ्या लिखाणाचा प्रवास या लेखाने पुस्तकाचा शेवट करताना प्रा. अरुण ओगले म्हणतात ''या विविधांगी लेखांमुळे विचार करण्याची वृत्ती वृद्धिंगत होत गेली,

---

आधी ते तुमच्याकडे दुर्लक्ष करतात, मग तुमच्यावर हसतात, तुमच्या विरोधात लढतात आणि त्यानंतर तुमचा विजय होतो. – महात्मा गांधी

विचारांत स्पष्टता येण्यास मदत झाली. अभ्यासू वृत्ती अधिक चोखंदळ झाली, विषय सोप्या भाषेत व सोप्या पद्धतीने मांडण्याची हातोटी, विचारांची प्रगल्भता व परिपक्वता लाभली. आस्वाद, विश्लेषण, परीक्षण, आनंद, परखड वृत्ती अशा अनेक संवेदना वृद्धिंगत झाल्या. प्राध्यापकी पेशामुळे गृहपाठाची सवय लागली. हे सर्व वाचल्यावर 'अभ्यासोनी प्रकटावे,' 'विवेकेविण बोलो नये' 'प्रचितीविण बोलो नये', 'दिंसामाजी काहीतरी लिहीत जावे', अशा श्री समर्थ वचनांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही किंबहुना समर्थांची ही शिकवणच लेखकाच्या लिखाणाचा मूळ स्त्रोत आहे असं म्हणाव लागेल. प्रचंड मेहनत, जिज्ञासू वृत्ती, चिकाटी, प्रयत्न या जोरावरच ही यशस्वी वाटचाल झाल्याचे लेखक नम्रपणे म्हणतो.

वास्तुकलेवरील हे पुस्तक असल्यामुळे यामध्ये तांत्रिक भाग जरी असला, तरी ललित अंगाने आणि वर्णनात्मक शैलीने केलेली मांडणी यामुळे सामान्य वाचकाला त्यामध्ये गोडी वाटते आणि या कलेविषयी विविध अंगाने माहिती मिळाल्याचे समाधान व आनंद मिळतो.

लेखांमध्ये अंर्तभूत केलेली रेखाटने, रेखाचित्रे, विविध वास्तूंचे तसेच मान्यवर वास्तुतज्ज्ञांचे फोटो, आकर्षक पद्धतीने केलेली पुस्तकाची मांडणी याबरोबरच साधं, सुटसुटीत परंतु चित्तवेधक, अर्थपूर्ण आणि आकर्षक मुखपृष्ठ तसेच मलपृष्ठावर 'चिदाकाश - घटाकाश' या विषयीची संकल्पना व त्यावरील शंकराचार्यांनी मांडलेला सिद्धांत, लेखाच्या प्रारंभी लिहिलेला श्री समर्थांचा मौलिक विचार, फाईन आर्ट पेपरचा केलेला वापर, पुस्तकाची सुबक बांधणी या सर्व गोष्टींमुळे पुस्तकाला वेगळेच परिमाण प्राप्त झाले आहे याचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो.

वरील सर्व गुणवैशिष्ट्यांमुळे आणि विवेचनावरून केवळ वास्तुतज्ज्ञ, वास्तुविशारद आणि या शाखेतील विद्यार्थी यांनाच नव्हे तर सामान्य वाचकाला देखील हे पुस्तक आवडेल किंबहुना प्रत्येकाने ते वाचावे, संग्रही ठेवावे असं एक सामान्य वाचक म्हणून मी जरूर सांगेन. या पुस्तकाने मराठी साहित्य क्षेत्रामध्ये मोलाची भर पडली आहे. मात्र अशा पुस्तकामध्ये 'पेज मार्किंग' ची सोय असती तर बरे झाले असते. तसेच, काही लेखांमध्ये रेखाचित्रे आणि मूळ लेख यामध्ये विसंवाद जाणवतो. पृष्ठक्रमांक टाईप फार लहान वाटतो. पुढील आवृत्तीत लेखकाने या सूचना लक्षात घ्याव्यात ही अपेक्षा!

**- सुरेंद्र लागू**
२/पहिला मजला, यमुना सोसायटी,
गोविंद बच्चाजी रोड, चरई,
ठाणे - ४००६०१
दूरध्वनी क्र. :- २५३४०३४१

## कला वस्तूंची जागतिक बाजारपेठ

कला व पुराण वस्तूंच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आजवर ब्रिटन दुसऱ्या स्थानावर होते. पण या संदर्भातील एका अहवालानुसार ही जागा आता चीनने मिळवली आहे.

या विषयातील तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार युरोपियन युनियन आधिक खाली जाण्याची शक्यता आहे. 'द ग्लोबल आर्ट मार्केट इन २०१० क्रायसिस अँड रिकव्हरी' या युरोपियन फाईन आर्ट फांउडेशन च्या अलीकडील एका अहवालात नमूद करण्यात आल्यानुसार लिलावातील प्रवाह हे चिनी ग्राहकांच्या वाढत्या संख्येचे व वस्तूंच्या वाढत्या किमतीचे निदर्शक आहेत. चीनची कला बाजारपेठ व तिची जागतिक बाजारपेठेतील सहभाग यांची किंमत जवळजवळ दुप्पट झाली आहे.

संदर्भ - एशियन आर्ट एप्रिल २०११
पृ. १ (खंड १४ अंक ६)

# आनंदाचा गुच्छ

*एखादा शब्द, त्याच्या अर्थाची उकल मनात रेंगाळत राहते. अर्थ सापडेपर्यंत मन बेचैन होते. अशाच एका अनुभवाबद्दल – संपादक*

'सर, ग्रंथालयातली ही सगळी पुस्तकं तुम्ही वाचलीत का?'

प्रत्येक ग्रंथपालाला हटकून विचारला जाणारा हा प्रश्न. विशेषत: प्रथम वर्षाचे विद्यार्थी जरा सलगी निर्माण होताच हमखास हा प्रश्न विचारतातच. प्रत्येक ग्रंथपालाला दरवर्षी जून / जुलै महिन्यात अनुभवास येणारा हा प्रसंग. अर्थात, त्याचं होकारार्थी उत्तर सत्य नसतं आणि सत्य उत्तर होकारार्थी नसतं. तेव्हा नुसतं स्मित करूनच हा प्रसंग निभावून न्यावा लागतो. ग्रंथालयात येणारे प्रत्येक पुस्तक जरी ग्रंथपाल संपूर्ण वाचत नसला, तरी ते निदान चाळून तरी बघत असतो. पुस्तकाचा विषय, मांडणी व्याप्ती अशा गोष्टी जाणून घेतल्या जातात. ते पुस्तक कोणत्या प्रकारच्या वाचकांसाठी उपयुक्त आहे, हे त्यातून कळते. शिवाय वाचनाचा एक प्रकारचा रियाज होतो व वैचारिक बैठक पक्की होते. मी स्वत: शक्य तोवर प्रत्येक पुस्तक चाळून बघतो. निदान त्यातील मनोगत, प्रस्तावना व सर्वात महत्त्वाचं म्हणजे, शेवटी संदर्भ ग्रंथसूची जर दिली असेल, तर ती आवर्जून पाहतो.

असंच एकदा एक धार्मिक पुस्तक हाती लागलं. मला वाचनात आवडीनिवडीचा धरबंद आवडत नाही. कोणत्याही विषयावरचं पुस्तक न्याहाळायला मला चालतं. त्यातूनच त्या त्या विषयातली सौंदर्यस्थळं नजरेस पडतात. धार्मिक पुस्तकातील सौंदर्यस्थळं, म्हणजे त्याची रसाळ भाषा, ओघवती वर्णनशैली आणि मुख्य म्हणजे शेवटी सांगितलेली फलश्रुती. म्हणजे हे पुस्तक वाचल्याने कसे पुण्य मिळते व न वाचल्याने पाप कसे वाढत जाते याचे विवेचन. यातील श्रद्धेचा भाग जरी बाजूला ठेवला तरी त्यातील काव्यसौंदर्याचे गारुड मनाला भुरळ घालतं, यात संशय नाही. माझ्या हाती आलेलं पुस्तक धार्मिक होतं. देवीस्तोत्रांचा संग्रह होता तो. यातील इंद्र विरचित 'महालक्ष्म्याष्टक स्तोत्र' हे स्तोत्र मला फारच आवडलं. महालक्ष्मीचं वर्णन त्यात केलेलं आहे. अत्यंत समर्पक व सोप्या शब्दातील ते वर्णन सहज समजतं, आवडतं व मनाला भावतं. मी ते पुन्हा पुन्हा वाचलं. एका श्लोकापाशी मात्र थबकलो. तो श्लोक असा होता.

महालक्ष्यम्यष्टकस्तोत्रं य: पठेत् भक्तिमान्नर: ।

सर्वसिद्धिमवाप्नोति राज्यं प्राप्नोति सर्वदा ।।

याचा अर्थ असा की, (हे) महालक्ष्मी (देवीचे) आठ (कडव्यांचे) स्तोत्र जो नर भक्ति (भावा) ने पठण करील (तो) सर्व सिद्धी मिळवतो (व) सर्वदा राज्य प्राप्त करतो.

यातील 'सिद्धीमवाप्नोति' या शब्दावर मी अडलो. हा संधी सोडवून पाहिला. सिद्धीम् + अवाप्नोति. आता 'वाप्नोति' या शब्दाचा अर्थ मला ठाऊक नव्हता. 'अ' हा 'नाही' असा अर्थ दर्शवणारा उपसर्ग. प्राप्नोति? पण अ + वाप्नोति म्हणजे काय? की, वाप्नोति म्हणजे प्राप्नोति? पण अ + वाप्नोति याचा अर्थ मिळवत नाही असा घ्यायचा का? म्हणजे तो नर सर्व सिद्धी मिळवत नाही. असं इंद्राला सांगायचंय का? पण ते संदर्भाशी जुळत नाही.

मी संस्कृतच्या सरांना विचारलं. पण, त्यांना पाठ्यपुस्तकाच्या पलीकडलं संस्कृत येत नव्हतं. तरी त्यांनी शब्दरूपावली, धातुरूपावली, तसेच व्याकरणाच्या काही

तुमच्याबद्दल सर्व माहिती असूनही तुमच्याशी मैत्री ठेवणारा, तुमचा खरा मित्र असतो. – एल्बट्र हबर्ड

पुस्तकांची ओढाताण करून अर्थ लावण्याचा थोडासा प्रयत्न केला. पण, मुळातल्या गोंधळात आधिक भर पडण्यापलीकडे त्यातून काही निष्पन्न झालं नाही. मग मी संस्कृत – मराठी शब्दकोश धुंडाळला. पण, त्यात हा शब्द कुठेच मिळून आला नाही. उत्तर मिळत नाही हे पाहून माझं कुतूहल वाढलं. मी हा शब्द अन्य कोणत्या श्लोकात वापरला गेलाय, हे पाहू लागलो. अनेक श्लोक वाचले, स्तोत्रे अभ्यासली. काहींचा अर्थ लागला. काही डोक्यावरून गेले. आधी मराठीत अर्थ वाचून मग श्लोक वाचण्याचाही उपद्व्याप केला. पण, प्रश्न अनुत्तरितच राहिला. पुढे इतर कामाचा व्याप वाढला, तसा हा विषय मागे पडला.

पण, मग अचानकच याची उकल झाली. माझे वडील संस्कृतचे जाणकार. अनेक श्लोक त्यांना अवगत. बोलताबोलता संस्कृत अवतरणं देणं, हा त्यांचा छंद. सामाजिक कार्यात रुची. निवृत्तीनंतर त्यालाच वाहून घेतलेलं. त्यानिमित्त सतत भटकंती आणि ज्यादिवशी त्यांचे पाय घराला लागतात, तो आमचा सुदिन. अशाच मग एका सुदिनी मी वरील श्लोक त्यांना वाचून दाखवला व 'सिद्धीमवाप्नोति' याचा अर्थ विचारला. त्यांनी लगेच सांगितलं, '' अरे, तो शब्द 'अव + आप्नोति' असा आहे. आप्नोति म्हणजे मिळवतो. पुढच्या प्राप्नोतिमध्ये हाच प्र + आप्नोति शब्द आहे.''

मी विचारलं, पण, 'अव' ही उपसर्ग तर विरुद्ध अर्थानें वापरतात ना?''

''अरे, तीच तर गंमत आहे. नेहमी ज्या उपसर्गाने अर्थ बदलतो, त्याच उपसर्गाने कधीकधी अर्थ बदलत नाही. उदाहरणार्थ, 'वि' हा उपसर्ग घे. 'वि' हा अभावत्व दर्शवण्यासाठी वापरतात. जोड – विजोड, स्मरण – विस्मरण वगैरे. तसेच, 'वि' ने विशेषत्वही दर्शवता येते. जय – विजय, ख्यात – विख्यात वगैरे''

''हे समजलं.'' मी मान डोलावली. ''पण, आता 'अव' बद्दलही सांगा ना.''

'' 'अव' हा उपसर्ग बऱ्याच अर्थाने वापरला जातो. कधी अर्थ बदलतो, कधी अर्थ तोच राहतो, तर कधी तिसराच शब्द बनतो. संदर्भाने हे लक्षात येतं.''

''उदाहरण'' सांगा ना प्रत्येकाचं माझी उत्सुकता वाढली होती.

वडिलांच्या चेहऱ्यावर अठ्ठ्याहत्तर पावसाळ्यांचं क्लान्त हसू उमटलं. ते म्हणाले, ''अरे, आता चटकन उदाहरण नाही आठवत. नंतर सांगेन.''

मी म्हणालो. ''ठीक आहे. म्हणजे शेष उद्या तर...''

तसे ते चटकन म्हणाले, ''घे, तुला उदाहरण हवे ना? हे घे. शेष – अवशेष, अर्थ बदलत नाही. गुण – अवगुण, अर्थ विरुद्ध होतो. गत – अवगत, शब्दच बदलतो...''

माझे वडिल बोलत होते. छटांच्या अनेक, अर्थांच्या अनेक शब्दप्राजक्ताच्या जोड्या आता टपटपत होत्या. नवे शब्द... नव्या जोड्या नवा शोध! आनंदाचा गुच्छच जणू त्यांनी माझ्या हाती दिला आणि त्याच्या सुगंधाने माझ्या मनाचा गाभारा शिगोशिग भरुन गेला.

**– प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये**
ग्रंथपाल,
स्वामी विवेकानंद रात्र महाविद्यालय,
दत्तनगर, आयरे मार्ग,
डोंबिवली (पूर्व) – ४२१२०१

●●●

आपण कसे असायला हवे, यापेक्षा आपण कसे आहोत याकडे प्रत्येकाने लक्ष द्यावे – अल्बर्ट आइनस्टाइन

# भारतीय संस्कृतीचा मूळ पाया

*भारतीय संस्कृती हा अतिशय गहन विषय आहे. या विषयातील अधिकारी व व्यासंगी अभ्यासक शंकरराव मठ यांनी या लेखात भारतीय संस्कृतीच्या मुळाशी असणाऱ्या चिंतनाचा गोषवार दिला आहे. - संपादक*

भारतीय संस्कृती ही दिव्य, भव्य व श्रेष्ठ आहे. ती भारतीयांचा आत्मा आहे. आपल्या ऋषिमुनीनी स्वत:च्या आचरणाने या संस्कृतीला बळकटी आणली आहे. आज हजारो वर्षे अक्षुण्णपणे या संस्कृतीने आम्हांला एक समाज म्हणून जगविले आहे. विश्वात आजवर अनेक संस्कृत्या निर्माण झाल्या व लुप्तही झाल्या. भारतीयावर स्वकीयांचे व परकीयांचे हल्ले होऊनही ही संस्कृती आजतागायत टिकून आहे. हिला एवढे सामर्थ्य कशामुळे प्राप्त झाले आहे. आध्यात्मिक बैठकीमुळेच ही संस्कृती टिकून आहे व जिवंतही आहे.

या संस्कृतीचा यथायोग परिचय आजच्या समाजातील घटकांना सातत्याने करून देणे अगत्याचे आहे. केवळ अभिमान, केवळ आस्था आचरणावाचून तोकडी पडते. आचरण करावयाचे म्हटल्यास तिचा यथायोग्य परिचय असणे आवश्यक आहे. समाजातील रूढी व परंपरा यांच्या मुळाकडे जाऊन त्यांच्या मागे सांस्कृतिक अधिष्ठान असल्याचा शोध घेणे आवश्यक आहे. मूळ सांस्कृतिक अधिष्ठानात बदल घडून आल्याने त्या रूढी आणि परंपरा या नावाखाली विद्यमान असून तदनुसार आचरण केले जाते. या साऱ्यांचा उगम शोधून काढून त्यांचे योग्य रीतीने आचरण व्हावे यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

भारतातील थोर पुरुष या संबंधीचा विचार सर्वसामान्यापर्यंत पोचविण्याचे कार्य करत आले आहेत. अगदी अलीकडे म्हणजे विसाव्या शतकाच्या मध्याला एका थोर ऋषितुल्य व्यक्तिमत्वाचा अस्त झाला. त्या थोर विभूतीचे नाव 'श्री अरविंद' असे आहे. त्यानी भारतीय संस्कृतीच्या मूलभूत पायाविषयी सविस्तर विवेचन केले आहे. त्यानी आपल्या ग्रंथातून या संस्कृतीविषयी मूलभूत गोष्टीचा उहापोह केलेला आहे. या ग्रंथातील विचाराने भारतीय संस्कृतीने भारतीयांचे जीवन कसे उजळून टाकले आहे याचा बोध होण्यास मदत होत आहे.

**धर्म आणि आध्यात्मिकता :**

हिंदू धर्मात सर्व प्रकारच्या तत्त्वज्ञानांना व श्रद्धांना मान्यता आहे. उदाहरणार्थ उच्च प्रकारचा नास्तिक वाद व अज्ञेयवाद यांना देखील मान्यता देण्यात आली आहे. सर्व प्रकारचे आध्यात्मिक अनुभव मान्य करण्यात आले आहेत. या धर्माला सर्व प्रकारची धार्मिके चालतात. सामाजिक कायदा भिन्न लोकसमूहात भिन्न असतो, अशी हिंदू समाज पद्धती आहे.

भारतीय समाजाने चार आवश्यक गोष्टी स्वीकारल्या आहेत.

प्रथम - धर्माने भारतीय मनात एक श्रद्धा सुप्रतिष्ठित केली. श्रद्धा ही एक उच्चतम जाणिवेची किंवा अस्तित्वाची अवस्था आहे. ती विश्वव्यापक व विश्वातील आहे.

दुसरे - धर्माने व्यक्ती जीवनाला श्रद्धेची आवश्यकता पटविली. कोणतीही व्यक्ती विकासाच्या व अनुभवाच्या द्वारा आपली तयारी करून प्रविष्ट होऊ शकते. हे व्यक्तीच्या निदर्शनास आणले.

तिसरे - भारतीय धर्माने व्यक्तीला ज्ञानाचा व अध्यात्मिक धार्मिक साधनेचा मार्ग दाखवून दिला.

---

केवळ लख्ख यश हे लक्ष्य ठेवू नका, तुमचं ज्या कामावर प्रेम आहे ते आत्मविश्वासाने करा म्हणजे यश आपोआप तुमच्या दारी येईल. - डेव्हिड फ्रॉस्ट

चौथी शेवटची – त्या उच्च पायावर जाण्याची त्यांची तयारी झालेली नाही. त्यांच्याकरता भारतीय धर्माने व्यक्तिजीवन व सामाजिक जीवन या संबंधातील व्यवस्था घालून दिली.

हिंदू धर्माचा आत्मा सामाजिक शिस्त नसून आध्यात्मिक शिस्त किंवा साधना हाच या धर्माचा आत्मा आहे. ज्ञान, श्रद्धा पूजा ईश्वरोन्मुख इच्छेने केलेले कर्म हे परमात्म्याला प्राप्त करण्याचे मार्ग आहेत. हा परमात्मा – स्वयंभू पुरुषोत्तम – हेच एकमेव श्रेष्ठ सत्य आहे.

तो निर्व्यक्तिक, केवळ अनंततत्व आहे. तसेच तो सर्वात्मक सर्वातीत नित्य पुरुष आहे. यापैकी कोणत्याही कल्पनेचा अंगीकार करून ईश्वराचा अनुभव मानव घेऊ शकतो. यात आध्यात्मिकतेचे सत्य हे आहे की हा ईश्वर सर्व अस्तित्वाच्या केन्द्रस्थानी आहे. कारण तोच सर्व अस्तित्व आहे. ईश्वरप्राप्ती म्हणजेच मानवाने आपला आत्मा प्राप्त करून घेणे होय.

**पाश्चिमात्य धर्म कल्पना :**

पाश्चिमात्य मनाने सर्व मानवतेला 'एक धर्म' ही आक्रमक व तर्कदुष्ट कल्पना दीर्घकाळ उराशी धरली आहे. एक श्रद्धा, एक संस्कार पद्धती, एक आज्ञा संभार, एक पौराहित्यनियम, असा संकुचित होऊन एकमेव धर्म म्हणून मिरवीत आहे. सर्वांनी तो स्वीकारावा अशी अपेक्षा केली जात आहे. इतकेच नव्हे हा धर्म न स्वीकारणाऱ्या माणसांना बक्षीस, आर्थिक लाभ, सामाजिक प्रतिष्ठा, इत्यादी लालूच दाखविली जाते. अन्यथा त्यांचा अनेक स्तरावर सुप्त वा उघड पद्धतीने छळही केला जातो. हिने भयंकर अशा असहिष्णुतेला, कौर्याला, सुधारणा विरोधाला, आक्रमक धर्मवेडाला जन्म दिला आहे. भारतीयांच्या लवचीक स्वतंत्र मनाची पकड अशा निर्मितीने केव्हाही घेतलेली नाही.

**भारतीय धर्म कल्पना :**

भारतीय धर्माला नेहमीच असे वाटत आले की मानवाची मने वृत्ती, बौद्धिक आकर्षणे विविध प्रकारची असल्याने आणि या विविधतेला मर्यादा नसल्याने अनंताकडे व्यक्तीने जाताना अमूकच आचारविचार तिने करावा, असे तिच्यावर बंधन नसावे. तिला विचाराचे व आचाराचे व पूजेचे वगैरे पूर्ण स्वातंत्र्य असावे

भारताची धर्मसंस्था आज सर्वात आधिक संपन्न, जिवंत, व नावाजण्यासारखी ठरली आहे. कारण तिची रचना पक्की आहे. बुद्धी व आत्मा यांच्या भावांचा समन्वय तिने केला आहे. ती दीर्घ काळ टिकलेली भविष्यकाळातही टिकणारी आहे तसेच तिच्यात पुनरुज्जीवनाची अमर्त्य क्षमता आहे.

**तुलना :**

पाश्चिमात्यांचा धर्म म्हणजे तर्कबुद्धीने किंवा देवशास्त्र बुद्धीने बनलेला काटेकोर पंथ निश्चित करणारा, निश्चित नैतिक कायदा, संस्कारविधि यांचा गठ्ठा, पक्की पुरोहिती किंवा प्रार्थना, सभा विषय संघटना या गोष्टीत बंदिस्त आहे. यातच त्यांना सुरक्षित वाटते.

भारतीय धर्म मोकळा, सहिष्णु, समन्वय साधणारा आहे. भारतीय धार्मिक मनाची ही समन्वय प्रवृत्ती व सर्व संग्राहकता लक्षात घेणे, तिजवर भर देणे जरुरीचे आहे. अन्यथा भारतीय जीवनाचा अर्थ, भारतीय संस्कृतीचा अर्थ आमच्या मुळीच लक्षात येणार नाही.

**भारतीय धर्माचे स्वरूप :**

भारतीय धर्म वा हिंदुधर्म हा काय संकल्पना आहे? हा धर्म काय शिकवतो? कसा आचार प्रतिपादन करतो? यात सर्व सामान्य घटक कोणते आहेत? हे समजण्यासाठी भारतीय धर्माच्या पायाभूत गोष्टीत उच्चतम, व्यापकतम

आध्यात्मिक अनुभूतीची तीन मूळ तत्वे कारणीभूत आहेत. याचा विचार केला पाहिजे.

पहिले तत्त्व – वेदाने प्रतिपादल्याप्रमाणे एक अस्तित्व आहे. ते म्हणजे 'एक सत् वि प्रा बहुधा वदान्ति 'हेच उपनिषदात 'एकमेवाद्वितीय' (ब्रह्म) म्हणून म्हटले आहे. हे एकच सर्व काही असून ते या सर्वाच्या पलीकडे आहे. भगवान बुद्ध याला चिरंतन तत्व म्हणतात. दैववादी याला ईश्वर म्हणतात.

मायावादी याला केवळ तत्त्व म्हणतात. जीव आणि निसर्ग म्हणजेच प्रकृती. या ईश्वराच्या आधीन असतात. एका शब्दात याला शाश्वत, अनंत असे म्हणता येते. हिंदु धर्माचा हा सर्वत्र समान असा पाया आहे. याचा शोध लावणे, सन्निध जाणे, प्रविष्ट होणे, एकरूप होणे हा या आध्यात्मिक अनुभूतीचा कळस होय. ही या धर्माची पहिली सार्वत्रिक श्रद्धा आहे.

दुसरे तत्त्व – शाश्वत अनंताकडे जाण्याचे अनेक मार्ग आहेत. कोणत्याही मार्गाने आम्ही अनंताकडे जाऊ शकतो. सर्व घटनांच्या मागे अनंत जाणीवयुक्त शक्ती आहे. अनंत शाश्वततेकडे कोणत्याही नामरूपाच्या आधाराने कोणीही जावे. कारण नामरूपाच्या द्वारा त्याच्या श्रेष्ठ तत्त्वाचा अनुभव घेण्यासाठी सर्वांनाच पुढे जाता येते. भारतीय धर्माचे हे सार आहे.

तिसरे तत्त्व – आंतरिक आध्यात्मिक जीवनाला अतिशय गती देणाऱ्या सर्व श्रेष्ठ भूमिकेने देवाकडे विश्वात्मक जाणिवेच्या द्वारा जाता येते.

थोडक्यात, मानवाने आपला विकास करून घ्यावा व आपले जीवन जगावे हे ध्येय मनात ठेवून आपण अज्ञानातून पार व्हावे व आपल्यातील ईश्वराची ओळख करून घ्यावी.

हिंदू धर्म समजणे म्हणजे या तीन पायाभूत गोष्टी एकत्र पाहाणे होय. तदनुसार साधना करणे हे हिंदु धर्माचे सारतत्त्व आहे. श्रद्धात्रय आहे. धर्म आणि आध्यात्मिकता यांचे काम ईश्वर व मानव यांमधील जोडणी करणे हे आहे. आमचे खरे अस्तित्व आमच्या आत असलेला देव आहे.

**व्यापकता आवश्यक :**

आध्यात्मिकतेतदेखील एकांतिकता मारकच ठरते. एकान्तिकतेची उंची कितीही उंच गेली तरी असहिष्णु आध्यात्मिकता मानवी जीवनात पूर्णता आणू शकत नाही. कारण त्याच्या ठिकाणची एकान्तिकताच अस्तित्वाचे प्रश्न यशस्वी रीतीने उलगडण्यास कमी आधिक असमर्थ करते. आध्यात्मिकता उच्चतम तशी व्यापकतम पण असावी लागते तरच तिला पूर्णत्व प्राप्त होते.

**वेद दुर्बोध का झाले?**

वेद शास्त्रातील गूढ शब्द आपला आंतरिक भाव फक्त द्रष्ट्यापुढेच प्रगट करतात असे ऋषि म्हणतात. कवयो निवचनानि निण्यानि वचासि। प्राचीन सूक्तांचे हे स्वरूप उत्तरकाळी समजेनासे झाले. सूक्तांचा गूढार्थ ज्ञान व परंपरा संपली, लुप्त झाली, आंतरिक गूढ विद्येचा वेगळा मार्ग होता. तो प्रतीकांनी काळजीपूर्वक झाकलेला असून या प्रतीकांचा अर्थ केवळ साधनसंपन्न संस्कारित साधकांनाच सांगण्यात येत असे.

वेद म्हणजे ज्ञानाचे पुस्तक, हे नाम पडण्याचे कारण वेदामधील सूक्तातील आंतरिक अर्थ होय. हीच आध्यात्मिक उच्च सत्ये होत.

हा आंतरिक वैदिक धर्म विश्वातील देवाचे मानसिक महत्त्व वाढवून आपल्या कार्याला आरंभ करता झाला. सर्व पातळ्यांना सत्य, न्याय, धर्म याचा आधार आहे. या तिन्हीचे सारभूत स्वरूप एकच आहे. तथापि भिन्न पातळ्यांवर या त्रिकाळीची भिन्न रूपे प्राप्त होतात.

उदा. बाह्य भौतिक प्रकाश उच्चतर आंतरिक प्रकाश, आणि उच्चतम आध्यात्मिक प्रकाश अशी तीन प्रकाराची मालिका असते. सूर्यदेव हा भौतिक प्रकाशाच्या अधिपति परंतु वैदिक मंत्र द्रष्ट्या कवीला तो मनाला प्रकाशित करणारा ज्ञानाचा किरण आणि त्याच बरोबर तो आध्यात्मिक प्रकाशाचा आत्मा व शक्ती आणि शरीर पण होतो. सूर्यदेव या सर्वशक्तीसह एकमेव अनंत ईश्वराचे एक प्रकाशमय रूप आहे. वेदातील सर्व देव याप्रमाणे ''बाह्य आंतर आणि आंतरतम'' अशी तीन कार्ये करणारे आहेत. त्यांना प्रगट आणि गुप्त अशी नावे आहेत. त्यांच्या बाह्य स्वरूपात भौतिक प्रकृतीच्या शक्ती असतात. त्यांचा आंतरिक अर्थ पाहिला असता त्यांना मानसिक कार्य असते आणि शिवाय हे सर्व देव एका उच्चतम सत्य वस्तूच्या भिन्न शक्ती आहेत. या उच्चतम सत्याला 'एकंसत्' एकमेव अनंत अस्तित्व म्हणतात. ही सर्वश्रेष्ठ वस्तू जाणावयास अशक्य असल्याने हिला वेदामध्ये 'तत् सत्याम्' एकंतत् ते सत्य, ते एक असे पुष्कळदा म्हटले आहे.

**यज्ञ संकल्पना :**

यज्ञ हा मानव व देव यांना एकत्र आणणारा दुवा आहे. यज्ञद्वारा दोघामध्ये विनियोग होत असतो, दोघे एकमेकांना मदत करीत असतात. दोघांचे हितगुज असते, ऐक्य असते. यज्ञाने देवाच्या शक्ती मानवाच्या ठिकाणी निर्माण केल्या जातात. यज्ञाने ईश्वरी प्रकृतीची विश्व व्यापकता मानवाच्या ठिकाणी निर्माण केली जाते. कारण देव हे सत्याचे रक्षक व संवर्धक आहेत. देव हे अमरत्वाच्या शक्ती आहेत. देव हे अनंत मातेचे पुत्र आहेत. अमरत्वाकडे नेणारा मार्ग हा देवाचा ऊर्द्धमुख मार्ग आहे. तो सत्याचा मार्ग आहे. तो सत्याचा धर्म (ऋतस्य पंथा) मानवाच्या ठिकाणी निर्माण करणारा प्रवास आहे. भारतीय आध्यात्मिकतेच्या विशिष्ट कल्पना बीज रूपाने या साधनेत आहेत.

**बौद्ध धर्म :**

बौद्ध धर्म वैदिक धर्माच्या आध्यात्मिकतेचा त्याग करून भारतीय धर्मात खंड पाडीत आहे. असा देखावा एकदा दिसला. परंतु सखोलपणे पाहता तसे घडलेले नाही, कारण बौद्ध धर्मातील 'निर्वाण' ही कल्पना स्वतंत्र नाही. उच्चतम वेदान्ती आध्यात्मिक अनुभव, म्हणजेच निर्वाण मानतात. निर्वाण हे कैवल्याचे नकारात्मक एकान्तिक वर्णन असल्याचे वेदान्ती म्हणतात. अष्टविध मार्ग नीतिमार्ग बुद्धाने मोक्ष मार्ग म्हणून सांगितला. तो मार्ग म्हणजे वेदातील 'ऋतस्यपन्या:' चे उदात्तीकरण सार्वत्रिक करुणा, सार्वत्रिक बंधुभाव हा 'आत्मा एक आहे' ही जी वेदान्ताची मूलभूत कल्पना आहे तिचा भौतिक व्यवहार होय.

**धर्मात बदल कसा झाला :**

भारतीय धर्माच्या बाह्य स्वरूपात बदल होत गेले. कोणतेही तत्त्व नष्ट झाले नाही मात्र वैदिक आचार व संस्कार याजागी दुसरे नवीन आचार, संस्कार येत गेले. वैदिक प्रतीकांचे विधींचे रूपांतर होत गेले. नवे विधी नवी प्रतीके उपयोगात येऊ लागली. मूळ पद्धतीत बीजरूपाने असलेल्या गोष्टी पुढे स्पष्ट रूपात व्यवहारात आल्या. विशेषत: मानसिक व आध्यात्मिक अनुभव व्यापक व सखोल केले गेले.

वैदिक यज्ञ दिवसे दिवस कमी होत राहिले. त्यांचे पूर्व स्वरूप नाहीसे झाले. अग्निकुंडाची जागा मंदिराने घेतली. यज्ञाने कर्म कांड जाऊन त्याची जागा मंदिरातील भक्तीने घेतली. वैदिक देवाच्या प्रतिमा मानसिक, अस्पष्ट व बदलणाऱ्या होत्या. या काल्पनिक मूर्तीच्या भौतिक मूर्ती बनल्या आणि या भौतिक मूर्ती यज्ञाच्या जागी बाह्यपूजेसाठी उपयुक्त झाल्या. वैदिक सूक्तांचा आंतरिक अर्थ मानसिक व आध्यात्मिक गूढ स्वरूपाचा होता. तो लुप्त झाला. आणि त्याच्या जागी पौराणिक व तांत्रिक धर्माचे व योगाचे

आंतरिक जीवन आले. हे जीवन पूर्वीहून व्यापक संपन्न संकीर्ण असे मानसिक आध्यात्मिक जीवन होते. परंतु त्यात पूर्वीची तीव्रता नव्हती. पूर्वीचा प्रकाश नव्हता.

**अवनतीचा काळ :**

वैदिक युग व बौद्ध धर्माच्या अवनतीच्या वेळचा काळ पौराणिक व तांत्रिक धर्माच्या अनुषंगाने व सिद्धीने व्यापला होता. धर्माचा पाया पौराणिक व तांत्रिक धर्माने उंचावला होता. या धर्माने आंतारिक मन, आंतरिक जीवन, आत्मिक प्रकृति हा धर्माचा पाया केला. सर्वसाधारण आध्यात्मिक जीवनाचे रूप द्यावे अशी पात्रता या धर्माच्या ठिकाणी असणारी तिसरी अवस्था असावी. अगदी अलीकडची तत्त्वज्ञाने याच अर्थाची आहेत. संत व भक्त यांच्या महान आध्यात्मिक चळवळीत हाच अर्थ आहे. भारतीय संस्कृतीच्या अवनतकाळी तिची शक्ती व ज्ञान आधिकाधिक प्रमाणात नष्ट होत होती. अशा काळी ही तिसरी अवस्था आणण्याचा उपक्रम झाला. भारतीय संस्कृती टिकून राहावयाची असेल, तिचा आध्यात्मिक पाया, तिचे आंतरिक वैशिष्ट्य टिकून राहावयाचे असेल तर या तिसऱ्या अवस्थेच्या विकासाचा उपक्रम होणे आवश्यक आहे. मानवी जीवनात उच्चतम, व्यापकतम, आध्यात्मिक भावना ती भरण्यासाठी भारतीय सभ्यता व संस्कृती जन्मली व टिकली आहे. भारतीय संस्कृतीकडे उपक्रम प्रेरणा, आधारभूत प्रेरणा, चिरंतन मध्यवर्ती प्रेरणा म्हणून पाहावयास हवे.

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

## *विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर*



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा,
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी,
माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

**गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर**

# खरा परमेश्वर

*परमेश्वराच्या स्वरुपाबद्दलचे काही चिंतन – संपादक*

प्रत्येकजण आपला धर्म, रीतिरीवाज, रूढी, वंश आणि परंपरा याप्रमाणे परमेश्वराला ओळखत असतो. त्याला नाव देण्याचा प्रयत्न करीत आसतो. कोणी त्याला शिव म्हणतो तर कोणी विठ्ठल म्हणतो, कोणी त्याला राम म्हणतो तर कोणी आल्ला म्हणतो. अशा वेगवेगळ्या नावांनी आपण त्याला ओळखत असतो. परमेश्वराला अनेक नावांनी ओळखले जात असले तरी तो असतो मात्र एकच हे आपण पक्के लक्षात ठेवले पाहिजे. ज्याप्रमाणे एकाच माणसाला बाबा, काका, दादा, भाऊ, मामा, नाना अशा वेगवेगळ्या नावांनी वेगवेगळ्या व्यक्ती ओळखत असतात त्याचप्रमाणे परमेश्वराचेही आहे. जरी एखाद्या माणसाला अनेक नावांनी ओळखले जात असले तरी व्यवहारात मात्र त्याचे एकच नाव कायम असते. शाळेच्या दाखल्यावर परवान्यावर, पासपोर्टवर, रेशनकार्डवर, ओळखपत्रावर अशा ठिकाणी एकाच नावाचा वापर सर्व ठिकाणी करण्यात येत असते. त्याचप्रमाणे परमेश्वराला अनेक नावे दिली गेली असली तरी त्याचेही एकच नाव या विश्वामध्ये आहे. ते नाव म्हणजेच 'परमेश्वर' (God) होय.

या जगात अनेक व्यक्ती अशा आहेत की, साक्षात राम, कृष्ण, विठ्ठल, येशू आपल्या समोर केव्हा येतील आणि केव्हा दर्शन देतील याची वाट पहात असतात. परमेश्वराचे साक्षात दर्शन घडावे, म्हणून ते काहीही करण्यास तयार असतात. सर्वांत प्रथम आपण एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी ती म्हणजे परमेश्वर आजपर्यंत कोणालाही दिसला नाही आणि भविष्यात तो कोणाला दिसणारही नाही, कारण परमेश्वर हा पहायचा नसतो तर तो अनुभवायचा असतो. जर कोणी आपल्याला मी परमेश्वराला पाहिले आहे असे सांगत असेल तर ते पूर्णपणे चुकीचे आणि खोटे आहे हे लक्षात घ्यावे. समोरील व्यक्ती आपणास मूर्ख बनवत आहे असे समजावे. ज्याप्रमाणे फुलामधील सुगंध, वातावरणातील हवा, शरीरातील आत्मा आपणास दिसत नसतानाही त्याचा अनुभव आपण घेत असतो त्याच प्रमाणे परमेश्वर दिसत नसला तरी त्याचा अनुभव घ्यायचा आसतो. पण ते सर्वांना सहज शक्य नसते. परमेश्वर सर्व ठिकाणी व्यापलेला आहे. प्रत्येक कणाकणात त्याचा अंश आहे. फक्त त्याला पहाण्याची दृष्टी आपल्याजवळ असायला हवी. आपल्या या दोन्ही डोळ्यांना तो केव्हाही दिसणार नाही. त्याला पहायचे असेल, त्याला ओळखायचे असेल तर आपल्याकडे आध्यात्मिक ज्ञानाचा तिसरा डोळा असायला हवा. या तिसऱ्या डोळ्याशिवाय तो कोणालाही दिसणार नाही किंवा त्याचा अनुभवही घेता येणार नाही. परमेश्वर हा अजर, अमर, अविनाशी आणि निराकार असूनही आपण त्याची आपल्या मनामध्ये एक आकृती (Image) निर्माण केलेली असते. त्या आकृतीप्रमाणेच आपणांस केव्हा परमेश्वर भेटेल, याची वाट आपण पहात असतो. आपल्या मनातील आकृतीप्रमाणे तो आपणांस केव्हाही भेटणार नाही. परमेश्वर कोणत्या रूपात आपल्या समोर येईल हे सांगता येत नाही. केव्हा तो भिकाऱ्याच्या रूपात येईल तर केव्हा लहान मुलाच्या वेशात येईल, तर केव्हा जनावराच्या रूपात आपल्यासमोर येईल. म्हणून प्रत्येक वस्तुमध्ये आणि सजीवामध्ये परमेश्वराचे वास्तव्य आहे, या दृष्टिकोनातून आपण त्याकडे पाहिले पाहिजे. म्हणजे आपोआपच

---

परिपक्वता येण्यासाठी वयाची किंमत मोजावी लागते. – टॉम स्टॉपर्ड

नकळत परमेश्वर भेटल्याचा आनंद आपणास घेता येईल.

परमेश्वर म्हणजे दुसरे तिसरे काही नसून ती एक सतचितानंद स्वरूप चैतन्यशक्ती आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर आपल्या आत्म्याचे देता येईल. आत्म्यामध्ये एक प्रकारची चेतना असते. आणि ही चेतना म्हणजेच एकप्रकारची चैतन्यशक्ती होय. कारण ही चेतनाच माणसांचे संपूर्ण शरीर चालवण्याचे काम करीत असते. म्हणून, या सतचितानंद स्वरूप चैतन्यशक्तीला आपल्या जीवनात खूप महत्त्व आहे. आपले संपूर्ण जीवनच या सतचितानंद स्वरुप चैतन्यशक्तीवर आवलंबून आहे. आपल्या मानवी जीवनाचा ती पायाच आहे. ज्याप्रमाणे इमारतीचा पाया मजबूत असल्याशिवाय त्यावर सुंदर शिखर बांधता येत नाही. पाया मजबूत नसेल तर ती इमारत केव्हा कोसळेल हे सांगता येत नाही. त्याचप्रमाणे सतचितानंद स्वरुप चैतन्यशक्ती जाणून घेत असताना तिचा पाया भक्कम पाहिजे, मजबूत पाहिजे. ही चैतन्य शक्ती आपल्या जीवनात महत्त्वाची असली तरी तिची ओळख करुन घ्यायची कशी? तिला जाणून घ्यायचे कसे? असे अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे रहातात. या सर्वांची ओळख करून देतो तो म्हणजे आपला 'गुरू'. कारण गुरू तेथे ज्ञान असते. गुरूच आपणास जीवनाचा योग्य तो मार्ग दाखवू शकतात. सत् म्हणजे सत्य आणि नित्यस्वरुपाचे होय. चित् म्हणजे जाणीव होय. तसेच आनंद म्हणजे चैतन्यशक्ती होय. या सर्वांचे सखोल ज्ञान आपणांस गुरुच देतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात गुरूला विशेष महत्त्व असते. आज अनेक फसवे गुरू दिसून येतात. ते नेहमी लोकांची लूबाडणूक करीत असतात. म्हणून खरा गुरू आणि खोटा गुरू कोणता हे आपणास ओळखता आले पाहिजे. संधीसाधू गुरूपासून सावध राहिले पाहिजे. दुसऱ्याला ज्ञान देणे दूरच उलट लोकांना अधिकच ते संकटात टाकतात. त्यांच्या मजबुरीचा फायदा घेतात. परंतु आज अनेक लोक फसव्या गुरूलाच खरा गुरू समजतात आणि जीवनात आधिकच संकटे ओढवून घेतात. पण लक्षात ठेवायचा मुद्दा हा की, गुरूशिवाय कोणालाही ज्ञानप्राप्ती होत नाही. म्हणून खऱ्या गुरूचा शोध प्रत्येक व्यक्तीने घेतला पाहिजे.

एकदा आपण गुरु निवडला म्हणजे त्यावर पूर्ण श्रद्धा ठेवली पाहिजे. श्रद्धा थोडीही डळमळीत होऊ देऊ नये. गुरूचा शब्द अंतिम शब्द असला पाहिजे मग तो आपल्या दृष्टिकोनातून चुकीचा असला तरीही. ज्याप्रमाणे घागरीला एखादे लहानसे छिद्र असले तरी त्यातून हळूहळू सगळे पाणी वाहून जाते त्याचप्रमाणे आपल्या मनात गुरुबद्दल थोडी जरी शंका निर्माण झाली तरी आपली सर्व साधना वाया जाते. आपली अशी समजूत असते की, एखाद्या गुरूकडून नाम किंवा दीक्षा घेतली म्हणजे आपणास ज्ञान मिळाले किंवा ज्ञानप्राप्ती झाली. आता आपले सर्व काम संपले. पुढे जे काही करायचे ते गुरूच करून घेईल. आपल्यावर येणारे दु:ख, संकटे गुरूच दूर करतील. एखाद्या व्यक्तीने लग्न केले म्हणजे तो मुक्त झाला, त्याचे सर्व काही संपले असे म्हणणे जसे मूर्खपणाचे ठरते, तसेच एखाद्या व्यक्तीने नाम घेतले किंवा दीक्षा घेतली म्हणजे सर्व काही सपले असे समजणे मूर्खपणाचे ठरेल. कारण लग्न केल्यानंतर संसारास खरी सुरुवात होत असते तर दीक्षा/नाम घेतल्यानंतर आपल्या जीवनाचा खरा प्रवास सुरू होत असतो. आपण गुरुकडून नाम / दीक्षा घेतली म्हणजे गुरू आपणास स्वीकारतीलच असे नाही. गुरू आपली परिक्षा घेत असतात. त्यांच्या परीक्षेत आपण पात्र ठरलो पाहिजे. तरच ते आपणास स्वीकारतील अन्यथा नाही. जो गुरू काट्यावरून चालण्याची आपली परीक्षा घेतो, तोच गुरू आपल्या शिष्याला कोटे टोचणार नाहीत याची काळजीही घेत असतो हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. यासाठी आपण विषयवासना, यश सुख मानसन्मान यांची आकांक्षा मानत बाळगू नये. अशा प्रकारच्या आकांक्षा आपली साधना

अनुभव हा मोठा शिक्षक आहे. तो प्रथम परिक्षा घेतो, नंतर शिकवतो.

केव्हाही फळाला येऊ देत नाहीत. शेतकरी दिवसभर शेतीला पाणी देऊन सायंकाळी पहाण्यासाठी शेतात जातो, त्यावेळी त्याच्या लक्षात येते की. सर्व पाणी शेतामध्ये पडलेल्या बिळामधून दुसरीकडेच वाहून गेले आहे. पूर्ण शेत कोरडेच आहे. तसेच, जो मनुष्य मानत वरील सर्व आकांक्षा बाळगून साधना करतो त्याची फसगत होते. जीवनभर केलेली साधना या वासनारूपी बिळांमधून जाते आणि तो कोरडाच रहातो. तो थोडीही प्रगती करू शकत नाही.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३, सुभाष रोड,
कुंभारखान पाडा, डोंबिवली (प.), जि. ठाणे
भ्रमणध्वनी - ९९३०१४८४४६

●●●

## मोटारींची वाढती संख्या

उदारीकरणामुळे देशात पैसा निर्माण झाला. त्याचा परिणाम म्हणजे मोटारींची संख्या वाढली, गतिमानता वाढून संपत्तीनिर्मितीला आणखी चालना मिळाली, तरी वाहतुकीचे प्रश्नही फार मोठ्या प्रमाणात निर्माण झाले आहेत. त्यांना आळा घालायचा म्हणजे मोटार वापरावर नियंत्रण आणायचं! विकासाच्या प्रक्रियेने निर्माण केलेला हा तिढा सोडवणं हे आजच्या वाहतूक तज्ज्ञांसमोरचे आव्हान आहे.

– संग्रहातून

## चीनचे चित्रकार

चीनचे प्रसिद्ध चित्रकार क्सू बिंग (जन्म १९५५) यांची एक मुलाखत एशियन आर्टच्या जून २०११ च्या अंकात आहे. ब्रिटिश म्युझियमसाठी त्यांनी पार्श्वभूमीपर चित्राचा एक मोठा प्रकल्प बनवला आहे. या वस्तुसंग्रहालयाचे अशियाई विभागाचे प्रमुख जॅन स्टुअर्ट यांनी बिंग यांची अशा प्रकारची कलाकृती पहिली होती व त्यानुसार वस्तुसंग्रहालयाने त्यांना सदर प्रकल्पाविषयी विचारले होते. या मुलाखतीत बिंग यांच्या छायाचित्रासह त्यांच्या काही चित्रांची छायचित्रेही देण्यात आली आहेत. ही मुलाखत इच्छुकांनी मुळातून वाचावी अशी आहे

संदर्भ: एशियन आर्ट : जून २०११
पृ. ६,७, ८ (खंड १४: अंक ८)

. . . . . . . . . . . . . . . . . . . .

## एशियन आर्ट

एशियन आर्ट हे लंडन येथून प्रकाशित होणारे मासिक आहे. त्यात जगभरातील व विशेषत: आशियाई देशातील कला क्षेत्रांवर आधारित बातम्या, लेख, मुलाखती, प्रदर्शनांचे वृतान्त, वस्तसंग्रहालये यांची या क्षेत्रातील अभ्यासकांना उपयुक्त ठरणारी माहिती असते. कला व उपयोजित कला प्रांतातील घटना व घडामोडी जाणून घ्यावयाच्या असतील तर हे वृत्तपत्र अवश्य वाचले पाहिजे. वृत्तपत्राचे संकेतस्थळ (www.asianannewapaper.com) हे असून वृत्तपत्राची सर्व माहिती या संकेत स्थळावर मिळू शकते

– संकलित

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*यज्ञ व यज्ञ संकल्पनेबाबत या लेखात माहिती देण्यात आली आहे - संपादक*

**प्रास्ताविक :**

दिशाच्या मागील वर्षांच्या अंकात काही प्रमाणात, आपण भारतीय संस्कृतीतील **'<u>यज्ञ</u>'** या संकल्पनेचा व त्याच्या संबंधित 'विषयाला' धरून विचार केला. पण 'यज्ञ' या संकल्पनेबद्दल मुळातच एवढा प्रचंड गोंधळ आहे की एवढ्या अत्यंत महत्वाच्या **<u>वैश्विक संकल्पनेचा व 'आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक' जीवन उद्दिष्टांशी संबंधित असणाऱ्या आणि ह्या पूर्णपणे प्रभावी संकल्पनेचा पूर्ण 'बट्याबोळ' झालेला आहे.</u>** त्यांत **'प्रक्षिप्त'** भाग किती **'विकृत व अज्ञानी'** किती, **व्यावहारिक स्वार्थी** किती, हे आपणच नंतर जाणू शकाल!



सध्या प्रचलित असेल्या 'यज्ञ' स्वरुपाला व माध्यमाला 'सत्य' समजणारे सर्वजण हे एका **"Self Deception Guarded Ignorance"** स्वफसवणूक व 'असत्यावर पांघरूण' घालण्याचा अपराध करत आहेत. हा आरोप गंभीर आहे, याची मला जाणीव आहे. म्हणूनच या 'यज्ञ' संकल्पनेचा पूर्ण अभ्यास व समीक्षा या व नंतरच्या दिशाच्या अंकात करण्याचे मी योजिले आहे.

**यज्ञ संकल्पनेचा उगम व उद्देश :**

'यज्ञ हा वेदपूर्वकाळाच्या समाजाला ज्ञात होता. वेदांचा काळच ५००० - १०,००० वर्षापूर्वीचा समजला जातो. 'यज्ञ' या संकल्पनेला वेद व वेदिक साहित्यात आदराचे व एक सर्वंकष शास्त्र म्हणून मान्यता आहे. यज्ञ ही संकल्पना विश्वनिर्मिती व संचालनाशी निगडितच नव्हे तर पूर्णपणे आधारभूत आहे. सध्याच्या भौतिकवादी शास्त्रांनीही मान्य केलेली वैश्विक मूलभूत संकल्पना म्हणजे (Consciousuess) 'चैतन्यशक्ती' म्हणून जाणली जाते. त्या चीजेमध्ये भौतिक व गुणात्मक परिवर्तन घडवून आणू शकणारी यज्ञ ही नुसती संकल्पनाच नव्हे तर एक सत्य, व अनंतकाळ चालणारी 'जिवंत यंत्रणा' आहे. सार्थ मंत्रपुष्पांजालि मधील प्रार्थनेत **"<u>ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । तेहनाकं महिमान: सचंत यत्र पूर्वेसाध्या: संति देवा: ।</u>"** असे वचन आहे. काय आहे त्याचा खरा अर्थ? तो जाणण्याचा प्रयत्न करू या!

**यज्ञ, यंत्रणा व कला विचार :**

यज्ञाला संपूर्ण भुवनाचे नाभिकेंद्र समजणे व जाणणे ही भूमिका आहे. ऋग्वेद, यजुर्वेद व अथर्ववेदात याचा वारंवार उल्लेख सापडतो.

**<u>अयं यज्ञो भुवनस्थ नाभि:</u> ऋ. १.१६०.३५**

**यजु. २३. ६२ अथर्व ९. १०.१४** याचा अर्थ सरळ आहे. विश्वाची संकल्पना आधुनिक विज्ञानाला संपूर्ण माहीत नाही, हे तेच कबूल करतील. त्यामुळे, वेदांच्या अभिप्रेत 'ब्रह्मज्ञानाच्या' भूमिकेतून विश्वसंकल्पना जाणली तर त्या रचनेत पृथ्वी, अंतरिक्ष व द्यौ (स्वर्ग) असे ढोबळ तीन भाग आहेत. किंवा, 'ब्रह्मांड', 'पिंड' व 'जैविक समाज' असे तीन घटक आहेत. 'यज्ञ' ही या भुवनांची नाभी आहे याचा अर्थ ह्या तीन भागांत विभिन्न पातळीवर होणाऱ्या **'संपूर्ण क्रियांची'** 'मूळ संकल्पना' ही एक **'यज्ञ प्रक्रिया'** आहे. हे समजण्यासाठी **'पुरुषसूक्त '** मधील यज्ञ संकल्पना जाणणे आवश्यक आहे. त्या सर्व जाणल्या तर सबंध वेदज्ञानांतील **'गुह्य ज्ञान'** समजू शकेल. **पुरुषसूक्त ही वेदांची कुंजिका' म्हणजे 'किल्ली' आहे.**

'श्रीमद् – भागवताचा' आधार घेऊन असे ठामपणे म्हणता येईल कीं ब्रह्माने विश्वनिर्मीती करुन एक महत्त्वाची मानव योनि' 'पुरुषतत्वावर' आधारलेली केली व त्याचबरोबर झाला मानवी समाज ('Human form') त्या जीवात्म्याला सुद्धा 'ब्रह्मज्ञान' प्राप्त होईल अशी योजनाही केली. पण, हे ज्ञान व सिद्धी कष्टसाध्य, 'तप व योग' साध्य आहे, हे निश्चित.

आपण सर्वसाधारण 'यज्ञ' स्वरूपाचे जे भौतिक स्वरूप व क्रिया पहातो, ते एक प्रतीकात्मक, रूपकात्मक स्वरूप आहे.

**आर्य समाजाचा वेदनिष्ठ अभ्यास :**

डॉ. कुसुमलता 'स्वामी दयानंद शिष्या' या आपल्या **'पुरुषसूक्त ' का विवेचनात्मक अध्ययन'** ह्या शोध ग्रंथात म्हणतात. **सर्गोदय** के समय स्वयं यज्ञपुरुष ने **यजमान** का, देवों ने **ऋत्विजों का,** वसन्त ने **आज्य** का, ग्रीष्म ने हवि का, वर्षाने **बर्हि** का **''अभिनय''** किया।

देवों ने **पुरुष – पशु** (जीवात्म) को बांधा, **सृष्टियज्ञ** का **सूत्रपात** हुआ। उसी की अनुकृति में **अग्निहोत्र** से लेकर **अश्वमेध** पर्यंत 'यज्ञो की कल्पना' की गई। (ती ही **'यज्ञोमयी कला** होय!)

उस परम शक्ति की **'यज्ञमयी कला'** के मानव जीवन में सम्भरणार्थ ऋषियों ने पश्चात्काल में नाना यज्ञों का विधान किया। उस यज्ञयागविधान का मूल पुरुषसूक्त ही है। सूक्तान्तर्गत **'हविषा देवा यज्ञमतन्वत' (मं ६) 'अस्यासीदाज्यम्'** (६) **तं यज्ञं बर्हिषं प्रौक्षन**(७) **'तेन देवा अयजन्त'** (८) **अग्नि... अजायत** (१३) **'सप्तास्यासन् परिधय'** (१५) **त्रिसप्त समिधः कृताः** (१५) **'देवा यद् यज्ञं तन्वाना** (१५), **'यज्ञेन यज्ञमयजन्त देवाः** (१६) आदि वाक्योमे प्रत्यक्षतः 'यज्ञसंस्था' के मूल प्रतिष्ठापक प्रतीत हो रहे है।

**उन वाक्यो में निविष्ट 'यज्ञ' 'हवि': 'आज्य', बर्हि; देव, अग्नि, परिधि और समिधः आदि शब्द स्पष्टतः यज्ञयागों की सम्भारसामग्री के भौतिक परन्तु संक्षिप्त की सूचना दे रहे है''**



ह्या पारिभाषिक शब्दांचा व क्रियांचा अर्थ आपण नंतर पहाणार आहोत. यज्ञ शब्द उच्चारला कीं जो अर्थ सहज प्राप्त होतो तो म्हणजे कुठल्या तरी एका देवतेला

प्रसन्न करुन 'यज्ञफल' प्राप्त होण्यासाठी 'यजमानाने' मंत्राचा उच्चार करून अग्निला समिधा, आज्य व हवि प्रदान करणे. ह्या भौतिक क्रिया व वैखरी पद्धतीने उच्चरवात संस्कृत मंत्र म्हणणे व अग्निकुडांत पेटवलेल्या ज्वालांमध्ये कांही वस्तू अर्पण करणे म्हणजे 'यज्ञ' असे समजले जाते. पण हा एक अत्यंत सामान्य 'स्थूल अर्थ' झाला. विश्वनिर्मिती व अनेक गूढ प्रक्रिया, रूपांतरे, परिवर्तने व संगतीकरण (Integral-ity) करणारी यज्ञक्रिया ही अत्यंत गूढ, रहस्यात्मक आहे, हे जाणले जात नाही. यजुर्वेदामध्ये अठराव्या अध्यायात प्रथम असलेल्या २७ मंत्रात <u>'यज्ञेन कल्पन्ताम्'</u> हा जो सनत घोष केला जातो त्याला महत्वाचा अर्थ आहे. 'कल्प' धातू चा अर्थ सामर्थ्य हा आहे. **'यज्ञेन कल्पन्ताम'** हा जो सतत घोष केला जातो त्याला महत्वाचा अर्थ आहे. **'कल्प'** धातू चा अर्थ **सामर्थ्य** हा आहे. **यज्ञ संकल्पनेत 'सामर्थ्य' अंतर्भूत आहे.** आणि **<u>'यज्ञ ह्याचा योगिक अर्थ आहे 'संगतिकरण'. 'यज्ञकलेतील' ही रहस्ये जाणण्यासाठी आपली मनोभूमिका नव्या स्तरावर न्यावी लागेल.</u>** त्यासाठी आपले तर्कशास्त्र आपले विश्वयंत्रणेचे वैज्ञानिक भौतिकज्ञान, आपल्यामनाची व शरीराची ओळख, आंतरिक कृतीच्या व्यापारावर केंद्रित करावी लागेल. ह्या साठी विश्वरचना, त्यांतील पातळ्या, त्यांचे धर्म म्हणजे कायदे व परस्पर संबंध जाणावे लागतील.

१) अव्यक्त जगातील तत्त्व ह्या संकल्पनावर 'भौतिक क्रियांचा कारभार अवलंबून असतो. त्याचे Physical Lawrs हे केवळ दर्शनी नियम दाखवतात, पण त्यापाठीमागच्या मूलभूत अदृश्य तत्वांची जाणीव दाखवत नाहीत. त्या जाणण्याकरिक केवळ भौतिक मानसशास्त्राच्या सध्याच्या मन (Mind) संकल्पनेच्या रूपावर व स्तरावर विसंबून चालणार नाही, तर योगिक साधने व तांत्रिक सिद्धि व साधनाद्वारे व ज्ञानाने, मनाला गूह्य रहस्ये जागृत सूक्ष्म चक्षुंने बघण्याची क्षमता मिळवावी लागेल. ह्या व इतर कांही बाबी विश्वाच्या व्यापारात सतत अस्तित्वात असतात व कार्यरत असतात, पण आपल्या भौतिक विज्ञानाच्या 'Paradigm' मर्यादेत ठोकळेबाज शैलीमुळे, त्या जाणण्याची मानसिक ज्ञानकेंद्रे (Cultivate) सुसंस्कारित केली जात नाहीत.

हे समजणे पुष्कळच कठीण वाटेल. मान्य आहे. पण, प्रयत्न साध्य आहे व सत्य आहे, मग ही श्रद्धा नक्कीच प्रथम अंकूरली पाहिजे व नंतर जतन व संवार्धित करून त्यावर प्रभूत्व मिळवावे लागेल. ह्या क्रिया व तपस्यालाच मी विवक्षित साधना व बोधक्रिया म्हणतो आहे. त्याला सर्वसाधरण शब्दात एक रहस्यात्मक 'अनुभूती' घेण्याचे व जाणण्याचे शास्त्र म्हणू शकू!!

मी शक्य तेव्हढ्या माझ्या तोकड्या शब्दसामर्थ्याने ह्या गूढ **''अनुभूतिशास्त्राची''** तोंडओळख करून देण्याचा एक प्रयत्न करतो आहे. कारण ही आवश्यकता पटल्यावरच महायोगी अरविंद यांनी **<u>"The Secret of the Veda"</u>** हा जवळ जवळ ५८२ पानांचा ग्रंथ, कां लिहीला, हे समजेल. ह्या त्यांच्या प्रयत्नांची सुरवात इ. स. १९१४ ते १९२० काळात झाली. वेद हे अपौरुषेय ज्ञान आहे. मानवी मन व बुद्धी किंवा तर्कशास्त्र आणि व्यक्त जगातल्या 'भौतिकवादा'' वर आधारलेले नव्हे. तर 'सत्य' आणि 'गहनं' ह्या Vedic Epistemoligy मधील ज्ञानशास्त्राच्या आवाक्यातील ज्ञान आहे व विश्वाचे ते खरे ज्ञान आहे.

**ब्रह्मज्ञान म्हणा हवे तर!!**

पण हे ज्ञान अजूनही मानवी बुद्धीच्या व तर्क पद्धतीवरील आकलनापलीकडे (Cognisance) आहे. त्या ज्ञानाचा संभाळ म्हणूनच वेदपठण, उपनिषद, वेद संहिता, पुराणे, ब्राह्मणे, अरण्यके, कथा, योग, तंत्र, मंत्र यंत्र ह्यांच्या मदतीने ह्या भारतभूमीवर स्थिरावलेल्या मुख्यत: हिंदू धर्म मानणाऱ्या समाजाने **<u>'सांस्कृतिक वारशाने'</u>** जपले आहे.

हे विष्कळित तुटक व तोकडे ज्ञान एखाद्या 'जिग सॉ पझल' (Jig Saw Puzzle) या व इतर अनेकांच्या प्रयत्नांती सुद्धा अपूर्ण ज्ञानाच्या अवस्थेत आजही आहे! मग आपल्या नजीकच्या काळांत स्वामी दयानंद (आर्य समाज) व महायोगी अरविंद त्यांनी कोणते नवीन प्रयत्न केले व अर्थ लावले ते जाणणे महत्वाचे ठरेल.

वेदांची सहा दर्शने वा वेदान्त ही केवळ मानवी बुद्धीने रचलेली 'तत्वज्ञाने आहेत. म्हणजेच एक तऱ्हेचे Philosophy चे प्रकार आहेत. म्हणूनच बाळशास्त्री हरदास म्हणतात, त्याप्रमाणे वेदांच्या सध्याच्या संहिता, ह्या सुद्धा 'हिमालयीन ऐतिहासिक प्रत्ययानंतर' संकलित केलेली व महर्षी व्यास वगैरेची रचित संहिता ही दुसरी व दुय्यम दर्जाची संहिता आहे. 'अनुभूती शास्त्र' हेच खरे त्यामुळे ज्ञानाचे शास्त्र व खरा बोध देणारी ही यंत्रणा उपलब्ध आहे. विश्वासार्ह आहे!! त्यामुळे वेदांचे अर्थ लावण्याचे प्रयत्न चालूच रहावयाला हवेत. की जोपर्यंत मानवी समाजाला आपल्या जीवनाचे व विश्वाचे गूढ उकलत नाही. 'यज्ञ' ही या धडपडीला मोठा आधार आहे.

महायोगी अरविंदाच्या शब्दात त्यांची भूमिका पाहू या.

**"We find in the Gita the word 'Yajna' 'Sacrifice,' used in a Symbolic Sense for all actions whether internal or external, that is consecrated to the Guds or to the Sugreme. (p. 39)"** was such symbolic use of the word born of a later philosophical intellectuality, or was it inherent in the Vedic idea of Sacrifice?

**प्रतिकाचे गुह्य अर्थ व क्रिया :**

ह्याचा अर्थ यज्ञकुंड, कुंडातील ज्वाला, अग्नि ज्वलन, प्रज्वलन, तुपाची आज्य म्हणून योजना, समिधांची आहुती, यज्ञकुडा भोंवती बसलेले यज्ञसंस्थेचे अधिकारी वर्ग, जसे –'होता, ऋत्विक, पुरोहित, ब्रह्मा, अध्वर्यू हे एकएकटे व सर्वजण मिळून एक प्रतिकात्मक स्वरूपी आहेत. त्यांची अस्तित्वे ही केवळ Symbolic आहेत.

खुद्द 'यजमान' हा सुद्धा प्रतिकात्मक आहे कारण 'यजनाची' कृती ही तो जीवात्मा करीत असतो. 'शरीर' ही समिधा, हदय ही 'वेदी' व 'यूप' आहे. संकल्प हे 'घृत' (आज्य तूप आहे), तप हे 'अग्नि' आहे. भ्रम हा होता आहे, मन 'अध्वर्यू' 'श्रोत्ते' 'ब्रह्मां' आहे ह्या पद्धतीच्या प्रतीकाद्वारे होणाऱ्या बहीर्ग्रत क्रिया ह्या मार्फत प्रतीकांच्या आंतरिक संकल्पनायुक्त चीजांनी यज्ञाच्या गूढ क्रिया व उद्दिष्ट व फलित जाणणे व प्राप्त होते हा खरा यज्ञ होय.

'यज्ञाची फलिते' जी 'भौतिक स्वरूपाची' मानून 'मनोकामना' केल्या जातात. त्यांची खरी आध्यमिक स्वरूपे जाणणे व प्राप्त करणे ही खरी यज्ञक्रिया आहे. गायी व घोडे व सोने व युद्धात विजय ही लाक्षणिक स्वरूपे आहेत. 'गौ' (गाय) ही आध्यात्मिक प्रकाश व विमर्श ज्ञान व 'अश्व' ही आध्यामिक शक्ति स्वरूपे आहेत.

युद्ध हे स्वतःच्या प्रवृत्तीतील सूर असूर यांचे युद्ध व लढा आहे त्या <u>युद्धात</u> दैवी प्रवृत्तीचा विजय मिळवणे हे <u>यज्ञक्रियेचे</u> साध्य आहे.

विष्णुसहस्रनामात अनेक विशेषणे दिली जातात भगवान विष्णु म्हणजे 'पुरुषोत्तम' ह्या संज्ञेला ह्या स्वरूपाची वर्णने कां सांगितली आहेत? हा एक आदर्श – Roll Model व तो आर्य संस्कृतीतील आहे. त्यांतील नमून्यादाखल एक विशेषण घेऊया.

**<u>''जितक्रोध :''</u>** म्हणजे ज्याने क्रोध जिंकला आहे. क्रोधावर संयम मिळवला आहे व मात केली आहे. पण, मानवाला संसारात, जगात क्रोध तर येणारच, तेव्हां, त्याच्याशी अंतर्गत युद्ध करून शांत स्वभावगुणाने विजय मिळवायचा आहे. आणि अंतरंगात असलेला क्रोधी स्वभाव मूलतः बदलून शांत स्वभाव करावयाचा आहे. ह्या प्रयत्नालाच 'यज्ञ क्रिया' चे स्वरूप आहे व 'अग्नि' व देवता

शक्तिच्या मदतीने केलेल्या यज्ञरूपी प्रयत्नांना 'शांत स्वराचे' स्वभाव गुण प्राप्त होतातं आणि ते कायम स्वरूपाचे रहातात हे खरे आंतरिक यज्ञाचे फलित आहे.

हे केवळ बहिरंगात केलेल्या भौतिक यज्ञाने कसे प्राप्त होणार? कांही विद्वान अशातऱ्हेचे 'कोणतेही फलित वा मूलभूत बदलसुद्धा ''द्रव्य यज्ञाने'' किंवा 'काम यज्ञाने' प्राप्त होतात असा दावा करतात. पण, मला हे अशक्य वाटते. कारण, मनाच्या नैसर्गिक वा जन्मतः प्राप्त झालेल्या स्वरूपावर एखादा कायम स्वरूपाचा मौलिक फरक व तोही संपूर्ण भविष्यात टिकून रहाणारा – जन्म जन्मांतरीच्या भ्रमणात होऊ शकेल व टिकेल ह्यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. ह्या *प्रभावी मौलिक बदलासाठी मानवी प्रयत्नांच्या जोडीला निसर्ग व वैश्विक आध्यात्मिक शक्ति म्हणजे त्यांना Natural, प्राकृतिक, दैवी किंवा Spiritual शक्तिंची मदत व संस्कार आणि शक्ति आवश्यक असावयालाच हवी. ह्या शक्तिच्या प्रकारात 'अग्नि' – जातवेद, (ऋग्वेद) ही शक्ति प्रधान शक्ति होय. आणि तिची मदत 'यज्ञ' ह्या सत्यदर्शनात 'अव्यक्त जगातील आवाहन' केलेल्या **देवतांच्या** मदतीने व **विशिष्ट संगतीकरण** व दैवी पद्धतीनेच होऊ शकेल. **बहीर्गत 'यज्ञ'** हे. केवळ ह्या यंत्रणेला अदृश्य शक्ती व दैवी मदत मिळवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांची, तपाची, साधनेची **प्रतिकात्मक नक्कल** किंवा अगोदर म्हणल्याप्रमाणे **एक 'अभिनय' होय. ह्या अभिनयाचा उद्देश 'नकल' कडून 'असल' कडे जाण्याचा होय.**

'यज्ञ' ही एक मूलभूत वैश्विक यंत्रणात (Process) आहे. तिचा मूळ उगम व योजना 'विश्वनिर्मीती व त्यांतील 'जीवात्म्याच्या संदर्भात Consciousness 'चैतन्य शक्ति' मधील गुणात्मक बदल करण्यासाठी आहे, असे मानल्यावर, प्रश्न उभा राहता तो हा कीं ही यज्ञ यंत्रणा पृथ्वीवर देहबद्ध जीवात्म्याला प्राप्त करून देण्यासाठी त्या निर्मात्याला कोणत्या युक्त्या योजाव्या लागल्या असतील? ह्या प्रश्नाचे उत्तर सरळ उघड मिळणे जरी दुरापास्त असले तरी ह्या दिशेने जे प्रयत्न ह्या पृथ्वीवर झाले त्याचा इतिहास भारतीय हिंदू समाज Civilization मध्ये भरपूर प्रमाणात प्राप्त आहे. विस्कळीतपणे असलेल्या ह्या ज्ञानाचा, माहितीचा योग्य तऱ्हेने अर्थ लापून यज्ञाच्या मूळ, अविकृत, सुसंवद्ध व मूळ उद्दिष्टांशी सुसंगत असे पुनर्जीवन ह्या संकल्पनेचे करणे अत्यंत आवश्यक आहे. नाहीतर ह्या अत्यंत सामर्थ्यशाली यंत्रणेचा विकृत व बाजारी स्वरूपाचा अज्ञानी अमंल जो अनेक शतके व युगे आडवा आला, त्यातून मुक्त होणे अशक्य आहे.

ह्या नशीबवान मानवी योनीला हे सत्यज्ञान प्राप्त व्हावयाला हवेच नाहींतर त्यात विघ्ने येऊन सध्याचे गोंधळ व बुवाबाजी चालूच राहील. **हा एक <u>'आध्यात्मिक भ्रष्टाचार'</u> चालू आहे असे मला मनोमन वाटते.**

म्हणूनच काही प्रामाणिक, अधिकारी व्यक्तिंना याबद्दल काय वाटते हे जाणणे आवश्यक ठरेल. योगायोगाने माझ्या हातांत अहिताग्नि नाना काळे ह्यांचे कांही हस्तलिखीत पडले आहे. 'अग्निहोत्र' 'प्रवर्ग्य विधी' व यज्ञ ह्या विषयावरचे निरूपण उपलब्ध झाले. त्यांची कांही अनुभूतीवर आधारलेली व जाणलेली विधाने लिहितो. मग त्यांचे अर्थ व भाष्य कसे अहिताग्नि नाना काळे, हे 'श्रौत यज्ञातील देवता ध्यान विचारा कडे लक्ष वेधतात. ते पहा संदर्भ आहे – जैमिनीय पूर्वमीमांसेचे संघर्षकांड व दैवतकांड (१३–१६) चार अध्याय.

**<u>'यस्यै देवतायै व षटकुर्यात तां ध्यायेत।।</u>** ह्या देवता ध्यानाबद्दलच्या श्रृतीकडे लक्ष वेधतात. व षटकार म्हणजे स्वाहाकार. यज्ञामध्ये जर देवतांचे आवाहन व दर्शन झाले नाही तर ती एक शुष्क यज्ञकला होईल.

**''ऋचो अक्षरे परमे व्योमन''।। ऋग्वेद १-१६४** वेदमन हे देवतांचे शरीर मानावे लागते वेदमत्रांचा नादानुसंधान युक्त उच्चार झाल्यावरच देवता (आध्यात्मिक सामर्थ्याच्या वैश्विक शक्ति) जागृत होऊन त्यांचा अविर्भाव यज्ञात होत असतो.


आत्मा हा अग्निरूपच आहे व हे 'सर्व यज्ञ संकल्पित अग्निसाधन', आत्म्यातच घडत असते.

**''आत्मयेव जुहोति''** या धर्मसूत्राचा अर्थ साधकाच्या अंतर्जीवनात उद्‌भवतो व त्याचे सर्व जीवनच यज्ञमय होऊन जाते.

इंद्रिये होमसाधन होतात - त्यात साधकच 'होता' असतो. परिछिन्न जीवात्मा स्वतः 'होता' बनून 'अपरिछिन्न विशुद्ध चैतन्यात्मक निजस्वरूप अग्निमध्ये संवेद्य सर्व विषयांची इंद्रियेद्वारा आहुति देतो.

हा 'खरा यज्ञ' साध्य होण्यासाठी काही तपस्या व प्रयत्न आवश्यक आहेत. पण, त्यात पळवाटा, किंवा समझोते होऊ शकत नाहीत हे तितकेच खरे. अर्थात चूकीच्या मार्गाने गेल्यास कांहीच हाताला लागणार नाही, हेही तेव्हढेच खरे आहे.

जोपर्यन्त कुंडलिनी शक्ती जागृत होत नाही तोपर्यंत योगस्थ होण्याच्या 'अंतर्यागाचा' अधिकारच प्राप्त होत नाही. पण त्यानंतर मात्र अशा सर्वस्पर्शीय अर्थाने इंद्रियगोचर आणि इंद्रियातीत अशा सर्वज्ञेय पदार्थांना यज्ञीय आहुती देण्याची योग्यता प्राप्त होते. इंद्रिये होमसाधन होतात व साधक 'होता' बनतो. आत्मस्वरूप शिव हे अग्नि असतात आणि जागृत शक्तिची विविध रूपे अग्निज्वाला असतात. प्रतिमाचित्रे अंतरगात, पिड ब्रह्मांडात अशी जागृत होऊन सत्य यज्ञ करतात. सोबत 'कुंडलिनी जागृती' ही प्रवर्ग्य विधीने प्राप्त होते त्या संदर्भात एक चित्र जोडले आहे.




*Human Body is Equipped with Three "Agni" Power for Triple Transformation Spiritually*

यज्ञ ह्या संदर्भातम पुष्कळ सांगावयाचे आहे पण सध्या या अकांपुरते एव्हढेंच!!

पुढील अंकात यज्ञाचे सध्याचे एक विकृत स्वरूप कसे मांडले जात आहे याचा नमुना देऊन त्याची त्याची चर्चा करू या. आणि 'यज्ञ संकल्पनेचे विशूद्ध स्वरूप आणखी विस्ताराने मांडू या.

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे. दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

मोठमोठी कामे ही शक्तीने केली जात नाहीत, तर सहनशक्तीने केली जातात.

# शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या

*पालघरच्या दांडेकर महाविद्यालयाच्या मागील वार्षिकातील एक लेख येथे साभार देत आहोत. महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचे कार्याध्यक्ष प्रा. अशोक ठाकूर यांनी दिलेल्या अनुमतीबद्दल आभार! – संपादक*

गेली कित्येक वर्ष जगासमोर इतर महत्त्वाचे विषय असतानाही साऱ्या जगाचे लक्ष दोन विषयांनी वेधून घेतले आहे. पहिला विषय आहे आर्थिक संकटांचा. या विषयामुळे जागतिक अर्थकारण अत्यंत धोक्याच्या अवस्थेत पोचले आहे. दुसरा विषय आहे हवामानात होणाऱ्या बदलामुळे निर्माण झालेल्या धोक्याचा. साऱ्या जगाने आता एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या शतकात प्रवेश केला आहे. हा प्रवेश करताना आर्थिक संकटाची तीव्रता कमी झाली आहे.

हवामानात होत असलेल्या बदलामुळे भविष्यात चांगले जीवन जगण्याविषयी चिंता वाटू लागली आहे. जागतिक स्तरावर सुधारणा घडवून आणण्यासाठी उपाययोजना करण्याची निकड भासू लागली आहे. याचे कारण आहे, चांगले पीक. चांगले पीक येण्यासाठी पावसाची, हवामानाची आणि पैशाची गरज असते. या ठिकाणी हवामान चांगले नसल्याने, पावसाची कमरता आहे. त्यामुळे शेतात पीक चांगले येत नाही. पीक चांगले येत नसल्याने शेतकऱ्यांचे भरपूर नुकसान होते. शेतकरी हा पैशाने आणि मनानेही गरीब असतो. शेतकऱ्यांच्या जीवनात अनेक अडचणी येतात. आणि त्या अडचणींना त्यांना सामोरे जावे लागते. शेतकरी हा प्रामाणिक असतो, भोळ्या मनाचा असतो. आपल्या भवितव्यासाठी धान्याची शेती करतो. जेणेकरुन त्या पैशाने तो आपल्या कुटुंबासाठी काही करू शकेल. आणि सावकाराचे कर्ज फेडू शकेल. पण पाऊस असा धोका देतो की, त्यामुळे पिकांचे नुकसान होते. आणि त्याच्या मेहनतीवर पाणी फिरते. शेतकरी इतक्या कष्टाने शेतात बी पेरतो आणि ते रोप वाढल्यावर त्यावर कीटक नाशक फवारणी करतो. त्यानंतर पाऊस हवा तेवढा पडत नाही. त्यामुळे पिकांचे नुकसान होते. त्यामागे शेतकऱ्यांचे कष्ट आणि पैसे वाया जातात. त्यामुळे शेतकरी कर्जामध्ये बुडतो. आणि सावकाराचे कर्ज न फेडल्यामुळे त्याला आपली जमीन सावकाराकडे गहाण ठेवावी लागते. जोपर्यंत तो त्याचे कर्ज फेडत नाही तोपर्यंत शेतकऱ्याला त्याच्याच जमिनीत काम करून कर्ज व्याजासकट फेडावे लागते. या जाचाला किंवा त्रासाला शेतकरी कंटाळतो आणि आत्महत्या करतो. त्याला आत्महत्या करण्यासाठी सावकाराचे कर्ज, पिकांचे नुकसान आणि वाढती उपासमार ह्या गोष्टी कारणीभूत असतात.

कधी–कधी अशी वेळ येते की, शेतात पीक लावले आहे. आणि पीक चांगलेही आले आहे. कीटक नाशक फवारणी केली आहे आणि अचानक प्रमाणापेक्षा आधिक पाऊस पडला असल्या कारणाने पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे बाजारपेठेत पिकांची कमतरता असल्या कारणाने महागाई वाढली आहे. त्यामुळे सामान्य शेतकरी किंवा सामान्य माणसे यांची उपासमार वाढू लागली. त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होते व तो आत्महत्या करतो. पिकांना परदेशी खूप मोठी मागणी आहे. शेतकरी बाजारपेठेत पिकांची विक्री करतात. ते त्यांना अतिशय कमी दरात विकत घेऊन तेच बाहेरदेशी मोठ्या प्रमाणात म्हणजे जास्त किंमतीत विकून ते नफा मिळवतात. आणि ज्यांची इतकी मेहनत असते त्यांच्या कष्टाला काहीच फळ मिळत नाही. त्या जाचाला कंटाळून शेतकरी आत्महत्या करतो.

आपल्या देशाला शरमेने मान खाली घालायला लावणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडत आहेत. १९९७ ते २००७ या दहा वर्षात सुमारे दोन लाख भारतीय शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असाव्यात असा अंदाज आहे. ही आकडेवारी निश्चितच धक्कादायक म्हणावी लागेल. या आत्महत्यांपैकी दोन तृतीयांश आत्महत्या या महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या पाच मोठ्या राज्यांमध्ये झालेल्या आहेत. या पाच राज्यात भारताच्या एकूण लोकसंख्येच्या एक तृतीयांश लोक राहतात हेही लक्षात घेतले पाहिजे. दुष्काळी परिस्थिती पुन्हा गंभीर होऊ शकते हा प्रश्न समूळ नष्ट होणार नाही असा धोक्याचा इशारा काही तज्ञांनी दिलेला आहे. त्यामुळे कितीही विपरित परिस्थिती जरी निर्माण झाली, तरी शेतकरी आत्महत्या करण्याचे पाऊल उचलणार नाही अशा तऱ्हेने धोरण आखण्याची गरज आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची अस्वस्थ करणारी एक बाजू आहे, जिच्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या बहुतेक शेतकरी तरुण होते त्यामुळे त्यांच्यामागे त्यांच्या बायका आणि मुले यांची अक्षरंश: वाताहत झाली आहे.

दुसरी बाजू ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी शेती करणे सोडून देण्यास सुरुवात केली आहे ही आहे उपलब्ध आकडेवाडीनुसार १९९१ ते २००१ या दहा वर्षात ८० लाख शेतकऱ्यांनी शेती करणे सोडून दिले आहे असा अंदाज आहे. तिसरी बाजू ही आहे की, भुकेचा प्रश्न सोडवण्यासाठी सरकारने अक्षरश: कोट्यवधी रुपये खर्च करण्याची अभिवचने दिली आहेत. पण त्या रकमा एकूण यंत्रणेमार्फत योग्य व्यक्तीपर्यंत पोहचण्यास विलंब लागत आहे. ती यंत्रणा पूर्वीप्रमाणेच थंड गतीने काम करीत आहे. मदत देणारी यंत्रणा आधिक गतिमान करण्याची निकड कुणीच लक्षात घेताना दिसत नाही. कोणताही पर्याय समोर उपलब्ध नाही अशी स्थिती निर्माण झाल्यावरच कर्जबाजारी शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. सरकारने शेतकऱ्यांची जी कर्जमाफी केली आहे, ती त्यांनी सार्वजनिक वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाच्या संदर्भात केली आहे. सावकार किंवा खाजगी व्यक्तिंकडून शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जांचा त्यात समावेश नाही. सावकारांनी योग्य व्याजदर आकारावा असे म्हणून भागणार नाही. शेतकऱ्यांवरील वाढता कर्जाचा बोजा त्यामुळे कमी होणार नाही.

दुष्काळ परिस्थिती पुन्हा गंभीर होऊ शकते. त्यामुळे कितीही विपरीत अवस्था जरी निर्माण झाली तरी शेतकरी आत्महत्या करण्याचे पाऊल उचलणार नाही, अशा तऱ्हेने धोरण आखण्याची गरज आहे. अवकाळी आणि चक्रीवादळाचा फटका देऊन निसर्गाने शेतकऱ्यांची पार दैना उडवून दिली. चक्रीवादळांमुळे शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्येला बळी पडतात. त्यामुळे धान्यांची कमतरता निर्माण झाली आहे. त्यामुळे महागाईला प्रारंभ झाला. महागाईमुळे उपासमार वाढली आहे. सामान्य शेतकरी आणि गरीब माणसे या उपासमारीला बळी पडतात.

अशा तऱ्हेने, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत चालल्या आहे. त्यास आळा बसला पाहिजे.

**– मिताली विनायक गायकवाड**
पालघर

●●●

***दिशा संपर्क दूरध्वनी***
**२५४२ ६२७०**

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

● इ. ३ री च्या एम. टी. एस. परीक्षेचा निकाल १००% लागला असून त्यांना इयत्ता ३ री च्या सर्व शिक्षकांनी मार्गदर्शन केले. खालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली.

१) नुपुर राजेश बर्वे, ठाणे केंद्रात २ री
२) वेदांत हळदणकर ठाणे केंद्रात ३ रा
३) मोहित भोईर व नारायण गवस ठाणे केंद्रात ५ वा
४) सर्वेश सडवेलकर व यश साळुंखे ठाणे केंद्रात ९ वा

मार्च २०११ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकालही १०० % लागला आहे.

**शिष्यवृत्ती विजेते विद्यार्थी**

१) ओजस अशोक मेंगडे जिल्ह्यात ३ रा २९०/३०० महाराष्ट्रात ५ वा
२) शुभम राजेश नांदगावकर जिल्ह्यात १७ वा २६२/३००
३) रसिका मनीष चौधरी जिल्ह्यात १७ वा २६२/३००
४) अथर्व अशोम कोळी जिल्ह्यात २० वा २५६/३००

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

● माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस आपल्या शाळेतील ४४ विद्यार्थी बसले होते. पैकी ३६ विद्यार्थी शिष्यवृत्ती वर्गास हजर राहायचे यांपैकी ४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. शाळेचा एकूण निकाल ७३% लागला.

१) स्वानंद रविंद्र बेहेरे – २१८ गुण जिल्ह्यात २९ वा
२) श्वेता एकनाथ देसले – २१० गुण जिल्ह्यात ३३ वी
३) मयंक एकनाथ शेटे–२२२ गुण जिल्ह्यात २७ वा
४) अभिषेक राजेंद्र ठाकूर–१९८ गुण जिल्ह्यात ३९ वा

● शालान्त परीक्षा मार्च २०११ या परीक्षेचा निकाल जून महिन्यात लागला आपल्या शाळेचा निकाल ९४.९२ असा लागला असून विद्यार्थ्यांच्या श्रेणीनुसार निकाल खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ९० % च्या वर | विशेष श्रेणी | २५ विद्यार्थी |
| ७६ % ते ९० % पर्यंत | विशेष श्रेणी | ७३ विद्यार्थी |
| ६० % ते ७५% पर्यंत | विशेष श्रेणी | ८४ विद्यार्थी |
| ४६% ते ६०% पर्यंत | विशेष श्रेणी | ५५ विद्यार्थी |
| ३५% ते ४५% पर्यंत | विशेष श्रेणी | ०६ विद्यार्थी |

**दहावी परीक्षा – पहिले दहा विद्यार्थी**

| क्र. | नाव | वर्ग | एकूण गुण | टक्के |
|---|---|---|---|---|
| १ | देसाई तनिषा पांडुरंग | १०अ | ५३२ | ९६.७३ |
| २ | पंडित प्रज्ञा महादेव | १०अ | ५२९ | ९६.७३ |
| ३ | बहाडकर शुभम राजन | १०अ | ५२७ | ९५.८२ |
| ३ | रिसबुड अनिकेत सुधीर | १०अ | ५२७ | ९५.८२ |
| ४ | कुलकर्णी संपदा किरण | १०अ | ५२६ | ९५.६४ |
| ५ | चंद्रराव ऋतुजा शिवाजी | १०अ | ५२५ | ९५.४५ |
| ५ | निंबाळकर अदिती भगवानराव | १०अ | ५२५ | ९५.४५ |
| ६ | सारोळकर यश संजय | १०अ | ५२४ | ९५.२७ |
| ६ | कोयंडे शुभम अनिरुद्ध | १०अ | ५२४ | ९५.२७ |
| ७ | सावंत दक्षता उमाकांत | १०अ | ५२० | ९४.५५ |
| ८ | नारकर श्रृतीका भालचंद्र | १०अ | ५१८ | ९४.१८ |
| ९ | म्हाले नम्रता राजेश | १०अ | ५१७ | ९४ |
| ९ | सावंत ओंकार सोभा | १०अ | ५१७ | ९४ |
| १० | किरकिंडे अक्षय नंदकुमार | १०अ | ५१६ | ९३.८२ |

**९० % च्या वर**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | पेडणेकर प्रियंका संदीप | १०अ | ५१३ | ९३.२७ |
| २ | झेंड शितल लक्ष्मण | १०अ | ५१२ | ९३.०९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | मोरे निखिल नामदेव | १०अ | ५०६ | ९२ |
| ४ | घावटे अनुज बाळासाहेब | १०अ | ५०५ | ९१.८२ |
| ५ | भावे ईशानी विनायक | १०अ | ५०४ | ९१.६४ |
| ६ | भांगे प्रियांका दयानंद | १०अ | ५०३ | ९१.४५ |
| ७ | खातु प्रथमेश मंगेश | १०अ | ५०० | ९०.९१ |
| ८ | म्हात्रे अदिती सुहास | १०अ | ५०० | ९०.९१ |
| ९ | मालणकर मधुरा मधुसुधन | १०अ | ४९८ | ९०.५५ |

**विषयात पहिले आलेले विद्यार्थी** :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मराठी | ९३ | देसाई तनिशा पांडुरंग |
| २ | हिंदी | ८३ | भांगे प्रियांका दयानंद |
| | | | पाटील सुरज सदाशिव |
| | | | बक्षी सोहम अजय |
| ३ | संस्कृत | ९९ | कोयंडे शुभम अनिरुद्ध |
| | | | भावे इशानी विनायक |
| | | | रिसबूड अनिकेत सुधीर |
| | | | बहाडकर शुभम राजन |
| ४ | इंग्रजी | ९० | चंद्रराव ऋतुजा शिवाजी |
| | | | सारोळकर यश संजय |
| | | | म्हात्रे नम्रता राजेश |
| ५ | गणित | १४८ | ढोकणे स्वप्निल कल्याण |
| | | | भांगे प्रियांका दयानंद |
| | | | गोलम अक्षय चंद्रकांत |
| | | | बहाडकर शुभम राजन |
| | | | देसाई तनिशा पांडूरंग |
| | | | जाधव प्रतिक पांडूरंग |
| | | | कोयंडे शुभम अनिरुद्ध |
| ६ | विज्ञान | ९८ | पंडित प्रज्ञा महादेव |
| | | | देसाई तनिशा पांडुरंग |
| ७ | समाजशास्त्र | ९९ | निंबाळकर अदिती भगवानराव |

## आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमशाळा :

शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांची नावे आणि क्रमांक (शहरी विभाग) खालील प्रमाणे –

**माध्यमिक शिष्यवृत्ती :**

परिक्षेला बसलेले विद्यार्थी – ६२

उत्तीर्ण विद्यार्थी – ५९ ९५.१६%

| अ. क्र | नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १ | तक्ष सत्रा | ७ |
| २ | प्रणिल जोशी | ८ |
| ३ | अर्थव वैद्य | ११ |
| ४ | नेहा केळकर | १४ |
| ५ | अमोघ गोखले | १५ |
| ६ | सौरभ कुलकर्णी | १५ |
| ७ | निनाद मराठे | १५ |
| ८ | सिद्धी सांगलिकर | १५ |
| ९ | अद्वैत नातू | १८ |
| १० | चैतन्य केळकर | १९ |
| ११ | अमित मलिये | २० |
| १२ | समृद्धी पाटील | २० |
| १३ | अर्थव प्रधान | २० |
| १४ | साकेत आगाशे | २१ |
| १५ | जान्हवी पाटणकर | २२ |
| १६ | अद्वैत भट | २४ |
| १७ | मिहीर महाडीक | २४ |
| १८ | रितीका घाग | २९ |
| २० | राज जोशी | ३० |
| २१ | प्राजक्ता घोलप | ३३ |
| २२ | हर्ष महाजन | ३३ |
| २३ | मृण्मयी ढाप्रे | ३५ |
| २४ | मितेश सरोदे | ३६ |

तुम्हांला भीतीवर मात करावयाची असेल तर घरात बसू नका; बाहेर पडा आणि कार्यमग्न व्हा. – डेल कार्नेजी

| | | |
|---|---|---|
| २५ | अनुज नरनावर | ३७ |
| २६ | जतिन परब | ३७ |
| २७ | अश्विनी भोय | ३९ |

**पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती :**

परीक्षेला बसलेले विद्यार्थी – ७३ उत्तीर्ण विद्यार्थी – ७२

| अ. क्र. | नाव | क्रमांक |
|---|---|---|
| १ | सिद्धार्थ पटवर्धन | ३ रा |
| २ | पल्लव खंडेकर | ७ वा |
| ३ | वैष्णवी यावगल | ८ वी |
| ४ | ध्रुव क्रिश्णन | ९ वा |
| ५ | बाम निहार | १० वा |
| ६ | गोरे आकाश | १० वा |
| ७ | चक्रवर्ती दिशा | ११ वा |
| ८ | हार्दिक सावंत | १२ वा |
| ९ | वेदांत केळकर | १३ वा |
| १० | इशित फाटक | १३ वी |
| ११ | तनुजा महाजन | १३ वी |
| १२ | सुचित गुप्ते | १४ वा |
| १३ | विघ्नेश कदम | १४ वा |
| १४ | अमेय कढे | १४ वा |
| १५ | ऋतुजा ओके | १५ वा |
| १६ | अमेय दानोले | १६ वा |
| १७ | स्तवन जाधव | १६ वा |
| १८ | मुग्धा कुलकर्णी | १६ वा |
| १९ | उर्वी गुप्ते | १६ वा |
| २० | राज पाटील | १७ वा |
| २१ | पियाली सिंग | १९ वी |
| २२ | ऋतुजा जोशी | १९ वी |
| २३ | मैत्रयी भारती | २० वी |
| २४ | तरंग डोंग | २० वा |
| २५ | निमिष वैद्य | २१ वा |

**शालाना परीक्षा :**

| | | |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | : | १९४ |
| उत्तीर्ण | : | १९३ |
| टक्केवारी | : | ९९.४८ % |
| विशेष प्रावीण्य | : | १३१ |
| प्रथम श्रेणी | : | ४९ |
| द्वितीय श्रेणी | : | १२ |
| उत्तीर्ण श्रेणी | : | ०१ |

**प्रथम १० :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्राची जयस्वाल | – | ९६.७२ |
| २) | मृण्मयी जोगळेकर | – | ९६.१८ |
| ३) | प्रियज नाबर | – | ९६.०० |
| ४) | पुष्कर ओक | – | ९५.८२ |
| ५) | रिया दावे | – | ९५.४५ |
| ६) | सिमरन भांगले | – | ९५.२७ |
| ७) | प्रियांका मोता | – | ९५.०९ |
| ७) | राधिका पाटील | – | ९५.०९ |
| ७) | सुप्रिया पाटील | – | ९५.०९ |
| ७) | प्रिया पुराणिक | – | ९५.०९ |
| ८) | श्रेया बापट | – | ९४.९१ |
| ९) | शरीव जोशी | – | ९४.७३ |
| ९) | मिहिर मुसळे | – | ९४.७३ |
| १०) | सलिल जोशी | – | ९४.५५ |
| १०) | केतकी जोगळेकर | – | ९४.५५ |
| १०) | रुपाली पिसाट | – | ९४.५५ |

**विषयात प्रथम :**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | इंग्रजी | – | सुप्रिया पाटील | ८९ |
| २) | मराठी | – | प्रिया पुराणिक | ९० |
| २) | | – | प्राची जयस्वल | ९० |
| ३) | संस्कृत | – | मृण्मयी जोगळेकर | ९९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३) | | – | अमित पाटणकर | ९९ |
| ३) | | – | पुष्कर ओक | ९९ |
| ४) | हिंदी | – | हर्षाली मुगुटराव | ८८ |
| ५) | गणित | – | प्राची जयस्वाल | १४९ |
| ६) | विज्ञान | – | प्राची जयस्वाल | ९८ |
| | | – | अद्वैत रणदिवी | ९८ |
| | | – | प्रियांका मोता | ९८ |
| | | – | रुपाली पिसाट | ९८ |
| | | – | प्रियांका नूलकर | ९८ |
| | | – | सलिल जोशी | ९८ |
| ७) | समाजशास्त्र | – | शरीव जोशी | ९८ |
| | | – | प्रिया नाबर | ९८ |
| | | – | रिया दाते | ९८ |
| | | – | श्रेया बापट | ९८ |

## जोशी बेडेकर महाविद्यालय

**महाविद्यालयाचा बारावीचा निकाल**

| | बारावी वाणिज | बारावी कला |
|---|---|---|
| परीक्षेस बसलेले एकूण विद्यार्थी | ६४६ | २६४ |
| विशेष प्रावीण्य | ७१ | ८ |
| प्रथम श्रेणी | २९२ | ५० |
| द्वितीय श्रेणी | २०१ | ८४ |
| उत्तीर्ण श्रेणी | ५१ | ४५ |
| अनुत्तीर्ण | ३१ | ७४ |
| निकालाची टक्केवारी | ९५.२०% | ७०.८३% |

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

बारावीचा निकाल

| | | |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | : | ४६४+१९+२५=५०८ |
| विशेष प्रावीण्य | : | ७७ |
| प्रथम श्रेणी | : | २०८ |
| द्वितीय श्रेणी | : | १५५ |
| उत्तीर्ण श्रेणी | : | २१ |
| अनुत्तीर्ण | : | २३+१२+१२=४७ |
| निकाल अधोषित | : | २८ |
| उत्तीर्णांची स्वरूप | : | ४४१+०७+१३+४६१ |
| निकालाची टक्केवारी | : | ९५.०४% |

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

**प्रथम तीन क्रमांक**

| | विद्यार्थी | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | सावंत शेफाली अनिल चारुशीला | ९१.३३% |
| २ | जयस्वाल रोशनकुमार ओमप्रकाश प्रेमशीला | ८९.३३% |
| ३ | अन्सारी आईमन इफ्तेकर शमा | ८८.५०% |

विषयांत सर्वप्रथम

| क्र. | विषय | विद्यार्थी | मार्क |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | अन्सारी आईमन इफ्तेकर शमा | ८९ |
| २ | मराठी | प्रभू शितल दीपक दर्शना | ८६ |
| ३ | हिंदी | जंगम लावण्या नागभूषण हिमाइअ | ८३ |
| ४ | संकृत | भंडारी रुचा गिरीश सरोज | ९० |
| ५ | गणित | कामत कार्तीक श्रीनिवास आशालता | ९९ |
| ६ | पदार्थविज्ञान | जयस्वाल रोशनकुमार ओमप्रकाश प्रेमशीला | ९५ |
| ७ | रसायनशास्त्र | जयस्वाल रोशनकुमार ओमप्रकाश प्रेमशीला | ९६ |
| ८ | जीवशास्त्र | १) जयस्वाल रोशनकुमार ओमप्रकाश प्रेमशीला | ९४ |
| | | २) अन्सारी आईमन इफ्तेकर शमा | ९४ |
| ९) | संगणक | १) फणसळकर मैत्रेयी विवेक नेहा | १८४ |
| | | २) गीते अभय रामदास ललिता | १८४ |

सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

टीप : प्रथम परीक्षार्थी + खाजगीरीत्या बसलेले + पुनर्प्रीक्षार्थी

– संकलित

# लँण्डस्केप आणि गार्डनिंग : हिरव्या वाटेवरचा एक अनोखा अभ्यासक्रम

*प्रगत अध्यायन केंद्राच्या अभ्यासक्रमाबद्दल*

सध्याच्या विस्कळीत पर्यावरण साखळीमुळे झालेल्या दुष्परिणामांस तोंड देण्यासाठी अभ्यासक्रमाच्या विविध हिरव्या वाटा तयार होत आहेत. शहरात विकसित होणाऱ्या बागा, घर संकुलात तसेच कार्यालयीन परीसरात तयार होत असलेले आकर्षक लँण्डस्केप, घरांच्या बाल्कनीमध्ये आणि गच्चीवर दिसणारी आकर्षक फुलझाडे आणि बागा, नागरी परिसरातील वाढत असलेले वृक्षारोपण आणि त्याबद्दलची आस्था या आणि अशा अनेक हिरव्या वाटांना एकत्रित करून ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाच्या प्रगत अध्ययन केन्द्रातर्फे पदविधर विद्यार्थासाठी पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन लँण्डस्केप आणि गार्डनिंग हा अभ्यासक्रम तयार केला आहे.



हा अभ्यासक्रम ऑगस्ट ते एप्रिल या ९ महिन्याच्या कालखंडात शुक्रवार अणि शनिवार सायंकाळी ५ ते ७ वेळेत गेली आठ वर्ष सातत्याने चालवला जात आहे.

बागकाम आणि निर्मिती वृक्षांची फुलांची आवड, निसर्गावर प्रेम असणाऱ्या कला, वाणिज्य, विज्ञान, स्थापत्य अभियांत्रिकी वैद्यकीय या शाखांतील पदविधरांसाठी हा अभ्यासक्रम म्हणजे हिरवाईचा एक देखणा अनुभवच आहे. वयाचे बंधन नसल्यामुळे सेवानिवृत्त मंडळी, उच्च शिक्षित गृहिणी यांच्या साठी फावल्या वेळेत शास्त्रीय पद्धतीने बाग काम, वृक्ष आणि फुल झाडांची ओळख व त्यांच्या सहवासातील ९ महीन्यांची कार्यशाळा हा एक त्यांच्यासाठी अनुक्रम असतो. या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना घर आणि संकुलातील विविध प्रकारच्या बागा, त्यांचे डिझाइन त्यासाठी योग्य वस्पतीची निवड त्यांची काळजी त्याच बरोबर शास्त्रीय पद्धतीने करावयाचे वृक्षारोपण, त्यांची ओळख, रोपवाटिका निर्मिती, हरितग्रहातील फुल निर्मिति, वामन वृक्ष विविध पुष्परचना, हिरवळ लागवड व जोपासना, ऑर्किड, पाम, बोगनवेलिया, कुंड्यांतील झाडे, गच्चीवरील वनस्पतीची खते आणि कीडनियंत्रण, वेलीचे विविध प्रकार त्याच बरोबर या सर्वांची मदत घेऊन आकर्षक लँण्डस्केप आणि गार्डनिंग या विषयातील तज्ञ व्यावसायिक मंडळी या अभ्यासक्रमासाठी व्याख्याते म्हणून योगदान देतात.

त्यांचा या क्षेत्रातील दांडगा अनुभव सर्व विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर सुद्धा कायम उपलब्ध असतो. मुंबई, ठाणे, पुणे आणि कोकण भागातील आकर्षक रोपवाटिका, उद्याने, हरितगृहे यांना शास्त्रीय पद्धतीने भेटी देणे या अभ्यासक्रमाचे मुख्य आकर्षण आहे. अभ्यासपूर्ण व्याख्याने बागेतील प्रात्यक्षिके, तज्ञांचे मार्गदर्शन, विविध वनस्पती आणि फुल प्रदर्शनास भेटी त्याचबरोबर उद्यान आणि लँण्डस्केप क्षेत्रातील सेवासंधी आणि स्वयंरोजगार उपलब्धी यामुळे गेली काही वर्षे हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांत लोकप्रिय होत आहे. विशेष म्हणजे आपले इतर शिक्षण किंवा व्यवसाय चालू ठेवूनही संध्याकाळच्या मोकळ्या वेळेत निसर्गाशी वृक्ष फुलांशी मैत्री ठेवणारा हा सुरेख रेखीव अभ्यासक्रम अगदी सहजपणे पूर्ण करता येतो. शासनाने कायद्याने बंधनकारक केलेल्या या योजनेस या अभ्यासक्रमात महत्वाचे स्थान आहे. प्रात्यक्षिकासाठी वेळ, वैयक्तिक लक्ष आणि अभ्यासासाठी बाह्य सहली यामुळे, इंग्रजी माध्यमातून उपलब्ध असणाऱ्या या अभ्यासक्रमाची प्रवेश मर्यादा २५ पर्यंतच सिमीत आहे.

या अभ्यासक्रमासाठी डॉ. नागेश टेकाळे ADVANCED STUDY CENTRE इमारत क्र. ६, ठाणे महाविद्यालय परिसर सिडको बस स्टॉप जवळ, चेंदणी, ठाणे (प.) दूरध्वनी : ०२२ २५३३९८७१ भ्रमणध्वनी : ९८६९६१२५३१ Email : asc@vpmthane.org

---

वसंतऋतूप्रमाणे प्रसन्नता ही मनोद्यानातील सर्व कळ्यांना फुलवते. – जॉन पॉल.

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वात कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी

स्वंतत्र वास्तू आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केल आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला २४० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्याचे मंडळाने ठरविले आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

भाकरीपेक्षा प्रेम व प्रशंसेसाठीची भूक जगात आधिक आहे. - मदर तेरेसा

(मुखपृष्ठावरून )

**संपादकीय**

आणि संयम बाळगून जाहिराती द्याव्यात असा संकेत व कायदाही आहे. स्पर्धेमध्ये 'यश' हे एकमेव ध्येय झाल्याने जाहिराती आधिकधिक 'खमंग', 'उत्तेजित' व्हायला लागतात. हेही अपुरे झाले की त्या 'लिंगप्रधान' होतात, मुलांचा त्यामध्ये वापर केला जातो. शेवटी त्या 'हिडिस' 'अभिरुचिहीन' होतात. कुठल्याही कलाकाराचे केस आणि कपडे धड का नसतात याचे उत्तर शोधायला फार दूर जायची गरज नसते.

नटनट्या सादर करत असलेल्या व्यक्तिरेखांमुळे त्यांचा प्रभाव लोकांच्या, विशेषत: तरुणांच्या मनात रुजू झालेला असतो. याच गोष्टीचा उपयोग करून जाहिरातीत या नटनट्यांचा वापर केला जातो. शिक्षणामधून अपेक्षित असलेल्या 'विवेका'ला येथे पूर्णविराम मिळालेला असतो. अशा वेळी जाहिरातीतील वस्तू व त्यांच्या उपयुक्ततेचे केलेले 'दावे' तपासण्याकरता स्वतंत्र व्यवस्था अस्तित्वात असायला हवी. अशा जहिराती तपासून त्यांच्या दाव्यांचा 'फोलपणा' त्यांनी समाजाला दाखवून द्यायला हवा. अशा फोल दाव्यांकरता शिक्षेची ही तरतूद केलेली असते. तत्वत: भारतातही हे सर्व नियम अस्तित्वात आहे.

दुर्दैवाने आज या सर्व संस्थांची दिवाळखोरी प्रकर्षाने दिसते. 'व्यक्तिस्वातंत्र्य,' 'कलास्वातंत्र्य,' 'उच्चारस्वातंत्र्य' यांच्या ढाली घेऊन या जाहिरातबाजांचे दलाल समाजाला अक्षरश: नासवत आहेत. या सर्व 'दलालां'नी आपली 'बुद्धिवादी' 'पुरोगामी' प्रतिमाही अशाच सनसनाटी, वादग्रस्त वक्तव्यांतून प्रस्थापित केली ही असते. महेश भट हे अशा बुद्धिवाद्यांपैकी एक मोठे नाव. चित्रवाण्यांचे तर हे एवढे लाडके आहेत की, काश्मीर प्रश्नापासून ते हुसेनच्या कलात्मक शैलीपर्यंतच्या विषयांवरील त्यांची मते ते कायम व्यक्त करतात व आपल्या पुरोगामित्वाच्या पताका वर वर नेत असतात.

अशी प्रत्येक चर्चा ही आधिकाधिक 'खमंग' 'भडक' व 'वादग्रस्त' करण्याकडे या वाहिन्यांचा कल असतो. त्यामुळे 'दर्शक' वाढतात, जाहिराती वाढतात व जाहिरातींचे 'दर' वाढतात. आजच्या अभिरुचीहीन, गोंधळलेल्या दिशाहीन सामाजाच्या निर्मितीमध्ये याच मंडळींना श्रेयाचा मोठा वाटा मिळतो.

धूम्रपानामुळे भारतात मृत्युमुखी पडणारांची संख्या सुमारे नऊ लाख आहे. त्यांतील अनेक मृत्यू हे अकाली असतात. आणि त्यामुळे त्यांची कुंटुबेही उद्ध्वस्त झालेली असतात. धूम्रपानाचे मानवी स्वास्थावरील विपरीत परिणाम, विशेषत: फुप्फुसांचा कर्करोग ही वैज्ञानिक दृष्ट्या सिद्ध झालेली बाब आहे. याबरोबरच श्वसनसंस्थेचे अनेक विकार यामुळे होतात. स्त्रीयांमध्ये धुम्रपानामुळे त्यांच्या स्वत:च्या स्वास्थाबरोबरच त्यांच्या नवीन गर्भावरही अनेक विपरीत परिणाम होतात. पूर्वी असा एक समाज होता की, अनेक वर्षे केलेले धूम्रपान फुप्फुसांच्या कर्करोगास कारणीभूत ठरते. हजरोंनी प्रकाशित झालेल्या संशोधन निबंधांनी आता हे सिद्ध केले आहे की, आल्पावधीतील धूम्रपानामुळेही कधीही भरून न येणारी हानी होते. 'केमिकल रीसर्च इन टॉक्सीकॉलॉजी' (Chemical Research in Toxicology) च्या डिसेंबर २०१० च्या अंकामध्ये शास्त्राज्ञांनी हे सप्रमाण सिद्ध केले आहे की, कर्करोग निर्माण करणारी रसायने धूम्रपानानंतर अवघ्या पाच ते दहा मिनिटांत शरीरात

(मलपृष्ठ ३ वर)

(मलपृष्ठ २ वरून )

**संपादकीय**

निर्माण होतात. आणि त्यांचा 'विपरीत' परिणाम व्यक्तीच्या 'गुणसूत्रांवर'ही होतो. ज्यांचे अंधानुकरण आपण करतो त्या पाश्चात्त्य देशांनी सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानावर बंदी गेली दहा वर्षे घातली आहे. भारतात ही बंदी २००८ साली अस्तित्वात आली. अर्थातच जहिरातबाजांनी यातून 'पळवाटा' काढायला सुरुवात केली. चित्रपट हे अशा 'छुप्या' जाहिरातींचे सर्वात्कृष्ट माध्यम असते, नायक संभ्रमात पडला, संकटात सापडला किंवा त्याला खूप आनंद झाला की, काढली त्याने सिगरेट. व्यक्तीच्या जीवनात अशा घटना घडोघडी होत असतात. अर्थातच असे ताण कमी करण्याचे साधन म्हणजे धूम्रपान हा संदेश अभिनेत्याकडून दिलेला असतो.

दिल्लीमधील एका स्वयंसेवी संस्थेने सुमारे ४००० शालेय विद्यार्थी व तरुण यांच्यावर होणाऱ्या अशा परिणामांचा नुकताच अभ्यास केला. त्यांना असे आढळून आले की चित्रपटांतील 'धूम्रपाना'च्या दृश्यांमुळे तरुणपिढी धुम्रपान करण्या करता आकर्षित व उदयुक्त झाली. अर्थात असे अनेक निष्कर्ष जगातल्या विविध देशांतील अभ्यासकांच्या संशोधन निबंधांतून मांडले गेले आहेत. श्री. रामदास या तत्कालीन केंद्रीय मंत्र्यांनी यामुळेच चित्रपटांतील धूम्रपानाच्या दृश्यांना बंदी घातली. अर्थातच व्यक्ती स्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्ते (?) श्री. महेश भट यांनी उच्च न्यायालयात त्याला आव्हान दिले आणि आमच्या उदार न्यायालयानेही ही याचिका दाखल करून घेतली व हा प्रश्न भिजत ठेवला.

फिलीप मोरीस ही जगातील सर्वांत मोठी सिगरेट कंपनी आहे. त्यांची वार्षिक उलाढाल अब्जावधी रुपयांची आहे. जगातल्या सर्व सरकारांनी धूम्रपानावर बंदी घालण्यास सुरुवात केल्यानंतर या कंपनीचा 'खप' म्हणजे 'नफा' कमी होऊ लागला. अमेरिकेतील न्यायालयांनी या कंपनीला लाखो डॉर्क्सची नुकसान भरपाई द्यायला लावली. अमेरिका व युरोपमधील अनेक स्वयंसेवी संघटनांनी ही असाच लढा देऊन १९९९ साली फिलिप मोरीस या कंपनीला 'धूम्रपान हे शरीराला अपायकारक असते' हे मान्य करावयास भाग पाडले. या कंपनीने ताबडतोब अनेक प्रसिद्ध चॉकलेटस्, बिस्किटे व तत्सम वस्तू विकणाऱ्या कंपन्या विकत घ्यायला सुरुवात केली. त्यांच्या या धोरणामुळे कंपनीचे नाव व बोधचिन्ह सतत लोकांच्या डोळ्यांसमोर राहील अशी योजना करण्यात आली. अर्थात अमेरिकेतील स्वयंसेवी संघटना व वैज्ञानिकांनी या कंपनीच्या कोणत्याही सिगारेटच्या नावाचा वापर अशा वस्तूंसाठी केला जाणार नाही व जाहिरातीत ही हे बंधन पाळले जाईल याची कायद्यात तरतूद करून घेतली. त्यामुळे त्यांच्याकडे प्रसिद्ध सिगरेटच्या नावाने विमान कंपन्या किंवा सोडा कंपन्या निघू शकत नाहीत. आमच्याकडे मात्र 'किंगफिशर' या दारू कंपनीचे नाव घेऊन विमान कंपनी निघते. 'बॅगपायपरच्या' नावाने पाणी आणि सोडा निघतो. इतकी दांभिकता व दिवाळखोरी फक्त भारतातच दिसून येऊ शकते. 'वैज्ञानिक दृष्टिकोन' बाळगा व 'अंधश्रद्धा' निर्मूलन करा, असे सांगणारे 'पुरोगामी' विचारवंत विज्ञानाच्या या दुरुपयोगाकडे मात्र सोईस्कर कानाडोळा करतात. वाइन ही सुद्धा दारूच आहे पण वाइन पिणे हे कसे प्रगत आहे हे सांगणारे लेख वृत्तपत्रातून छापून आणले जातात. महाराष्ट्रातल्या राजकारण्यांना वाइन विक्रींची झालेली घाई तर अनाकालनीय आहे. आजच्या घडीला तरी समाजाची यातून सुटका करेल असे सामाजिक, सांस्कृतिक नेतृत्व आपल्यामध्ये नाही हीच आजची खरी शोकांतिका आहे.

●●●

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.